नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १८५ * * अमरावती * बुधवार, दिनांक ७ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## मणिपूरमध्ये ३ तासांत दोन आयडी स्फोट

■ **वृत्तसंस्था, इंफाळ, दि. ६ :**
मणिपूर सरकारने बिष्णुपूर जिल्ह्यातील सलग दोन स्फोटांच्या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कडे सोपवला आहे. सोमवारी झालेल्या या स्फोटांमध्ये एका महिलेसह दोन जण जखमी झाले होते. हे स्फोट स्थानिक पातळीवर बनवलेल्या इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोसिव्ह डिव्हाइस (आयईडी) द्वारे घडवून आणले होते.
पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) आणि बिष्णुपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी स्फोट झालेल्या ठिकाणांना भेट दिली. या घटनेत सामील असलेल्या दोषींना पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू राहिली.

## शेतकऱ्यांचे मातीपर्व

आग्रलेख खरीखरी.. श्रीकृष्ण चांडक

आज एक विशेष अहवाल आमच्या वाचनात आला. मान्सूनपूर्व कापसाच्या बियाण्याची लागवड केल्यावर शेतकऱ्यांना तीन ते साडेतीन क्विंटल कापसाचे उत्पन्न मिळालेले आहे. मान्सून पूर्व लागवडीचा खर्च जास्त असतो कारण त्याला ठिबक सिंचनाद्वारे पाणी द्यावे लागते आणि त्यासाठीही बराच खर्च येतो. मान्सूनपूर्व पद्धतीने पेरणी केल्यावर शेतक?याला मजुरी सोडून एकराला कमीत कमी १८ ते २० हजार रुपये खर्च येत असतो. सध्याच्या घडीला कापसाला सहा ते सात हजारच्या दरम्यान भाव मिळतो. तो कापूस विकल्यावर शेतकऱ्याच्या हातात साधारणपणे वीस ते बावीस हजार रुपये येतात. आम्ही वर जो उल्लेख केलेला आहे त्या खर्चात शेतमालकाची आणि त्याच्या कुटुंबाची मजुरी याचा समावेश केलेला नाही. त्याचा समावेश केला तर किमान पाच ते सहा हजार अजून खर्च म्हणजे ज्यादा खर्च गृहीत धरावा लागेल. याचा अर्थ शेतकऱ्याला एका एकराचा लागवड खर्च जवळपास २५ हजार रुपये येतो म्हणजे मोठ्या प्रमाणावर विक्रीची किंमत पकडली तरी शेतकऱ्याची जेमतेम मजुरी निघते, त्याला नफा होत नाही. जागतिक पातळीवर कापसाचे भाव गेल्या तीन-चार वर्षापासून आपटलेलेच आहेत. कापूस, सोयाबीन, गहू किंवा हरभरा यांचेही भाव शेतकऱ्यांना नफा मिळवून देणारे नाहीत. कापूस महाराष्ट्रात नगदी पैसा देणारे पीक आहे पण एकूण जागतिक परिस्थिती समोर शेतकरी हतबल आहे कारण कोणत्याही पिकाची शाश्वती नाही. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये वाईट हवामानामुळे शेतक?यांना कापसाचे अपेक्षित उत्पन्न मिळालेले नाही. नेमकी हीच परिस्थिती इतर अनेक पिकांची आहे. त्यातच कडधान्यांचे भावही अजिबात समाधानकारक नाहीत, अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवरील आधीच असलेला कर्जाचा बोजा अजूनही वाढण्याची शक्यता आहे. वर उल्लेख केलेली पिके शेतकऱ्यांना एकेकाळी चांगला फायदा देणारी होती. मात्र मागील काही वर्षात अनेक भागातील संत्रा आणि मोसंबीच्या बागांनाही अपेक्षित असा मोहर येत नाही. भाजीपाल्याच्या उत्पन्नाचीही शाश्वती नसते म्हणजे एकूणच शेतकऱ्यांच्या खर्चाचे गणित ठरलेले असते. परंतु उत्पादन निघून किती पैसे हाती येतील याबाबतची माहिती खरोखर शेतकऱ्यांना नसतेच. शेतकऱ्यांना एखाद्या वर्षी एखाद्या पिकाचा चांगला भाव मिळतो गेल्या काही वर्षांपूर्वी तुरीला चांगला भाव मिळत होता पण आता तुरीलाही रोग आलेला दिसतो. त्यामुळेच सध्या कोणती लागवड करावी हे अनेक शेतकऱ्यांना समजेनासे झालेले आहे. एकाही पिकाची हमखास पैसे मिळवून देणारी म्हणजेच नफ्याची शाश्वतीच नाही. सरकारने तर अनेक वेळा कर्जमाफी केलेली आहे, सध्या तुरीवरही एका खतरनाक रोगाने हल्ला केलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हमखास नफा मिळवून देणारे पीक हातचे गेलेले आहे. त्यातच अमेरिकेने आपला शेतमाल भारतात विकत घ्यावा म्हणून दबावतंत्र वापरण्यास सुरुवात केलेली आहे. अशा एकूण विचित्र परिस्थितीच्या वातावरणात शेतकऱ्यांनी कुठे जावे, काय करावे आणि कसे जगावे की मरूनच जावे हेच कळत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल सरकारला काहीतरी निर्णय खंबीरपणे घेणे गरजेचे झालेले आहे. थोडक्यात अलीकडची वर्षे म्हणजे शेतकऱ्यांचे मातीपर्व आहे असे म्हटल्यास ही अतिशयोक्ती ठरू नये. सरकारने याची गंभीर दखल घेतलीच पाहिजे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## जुनी पाने उलटण्याची आमची इच्छा नाही...
# हिसाब अब भी बाकी!

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ६ :**
राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी केलेल्या एका विधानामुळे भाजपनेते आक्रमक झाले आहेत.
आम्ही मागची पाने चाळली तर दादांना बोलता येणार नाही. तसेच ८० हजार कोटींचा निकाल अद्याप लागलेला नाही, अशा कडक शब्दांत चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना थेट इशारा दिला आहे.
महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत सत्ताधारी महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या दोन प्रमुख पक्षांत 'तू-तू मैं-मैं' सुरू झाली आहे. पिंपरी-चिंचवडमधील एका पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर निशाणा साधताना, माझ्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले, हे सर्वांना माहित आहे. मात्र, ज्यांनी हे आरोप केले त्यांच्यासोबतच मी आज सरकारमध्ये बसलो आहे. असे म्हटले होते.
अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे भाजपची काहीशी कोंडी झाली होती. या विधानानंतर भाजपच्या गोटातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना इशारा दिला आहे.
अजित पवारांच्या विधानाचा समाचार घेताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना आरसा दाखवण्याचा प्रयत्न केला. ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा काही अभिमानास्पद नाही. या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी सुरू आहे आणि

**बावनकुळेंचा अजितदादांना इशारा**



अद्याप निकाल लागलेला नाही. त्यामुळे न्यायालयात काय होईल, त्यावर पुढची दिशा ठरेल. अजित दादा हे प्रगल्भ नेते आहेत, त्यांनी एका महापालिकेच्या निवडणुकीसाठी महायुतीत मनभेद निर्माण होतील असे वागू नये, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणालेत.
बावनकुळे यांनी अजित पवारांना जुन्या प्रकरणांची आठवण करून देत थेट इशारा दिला आहे. महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत एकमेकांविरुद्ध न बोलण्याचे ठरले असतानाही अजित पवार असे का बोलले? याची मला कल्पना नाही. पण त्यांनी असे बोलायला नको होते, असे बावनकुळेंनी म्हटले. मी त्यांना सल्ला देण्याइतका मोठा नाही, पण पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार अनेक वर्षे सत्तेत होते.
आम्ही जर आता त्यांची मागची पानं चाळली, तर त्यांना काही बोलता येणार नाही. मात्र, आमची जुनी पानं उलटण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांनी समन्वय समितीच्या नियमांचे पालन करावे, असा इशारा बावनकुळे यांनी दिला. महायुतीच्या दोन घटक पक्षांमधील हा वाद आता कोणत्या टोकाला जाणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठ काँग्रेस नेते सुरेश कलमाडी यांचे निधन



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ६ :**
पुण्याचे माजी खासदार तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांचे आज प्रदिर्घ आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. गत काही दिवसांपासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. त्यामुळे त्यांच्यावर येथीलच एका रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचार सुरू असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.
सुरेश कलमाडी यांनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सहा वर्षांहून अधिक काळ सेवा दिली. हवाई दलातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी पुण्याचे खासदार म्हणून दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या कार्यकाळात त्यांनी रेल्वे राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. रेल्वे राज्यमंत्री असताना रेल्वे अर्थसंकल्प सादर करणारे ते एकमेव राज्यमंत्री होते, ही एक विशेष बाब आहे.
सुरेश कलमाडी यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर भारतीय हवाई दलात प्रवेश केला. सुरेश कलमाडी यांनी १९६० मध्ये पुण्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतून पदवी पूर्ण केली. १९६४ मध्ये ते भारतीय हवाई दलात दाखल झाले. १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला होता. युद्धभूमीवर शत्रूचे दाबे दणाणून सोडणाऱ्या कलमाडी यांनी अनेक लढाऊ मोहिमा यशस्वीपणे फत्ते केल्या होत्या.
निवृत्तीनंतर कलमाडींनी 'युवक काँग्रेस'च्या माध्यमातून राजकारणात पाऊल ठेवले. लष्करी शिस्त आणि दांडगा जनसंपर्क यामुळे त्यांनी अल्पावधीतच दिल्लीच्या राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण केले. रेल्वे राज्यमंत्री ते पुण्याचे खासदार अशा अनेक पदांवर त्यांनी काम केले. मात्र, त्यांच्या व्यक्तित्वावर असलेला हवाई दलाचा प्रभाव त्यांनी आयुष्यभर जपला.
१९९६ ते २०११ या काळात त्यांनी भारतीय ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्षपद भूषवले. त्यांच्या कार्यकाळात भारतात अनेक आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. २०१० मध्ये दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या आयोजक समितीचे ते अध्यक्ष होते. या स्पर्धांदरम्यान त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते आणि २०११ मध्ये त्यांना अटकही झाली होती. मात्र, तपासाअंती पुरावे अपुरे ठरल्याने २०२५ मध्ये ईडीने क्लोजर रिपोर्ट सादर केला, जो न्यायालयाने स्वीकारला. न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांच्या सार्वजनिक जीवनातील सक्रियता पुन्हा वाढली होती. त्यांच्या निधनाने पुण्याच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा समारोप झाला आहे.
दरम्यान, कलमाडी यांच्या निधनावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी संघषार्तून घडलेला नेता गमावला.. अशा शब्दात शोकसंवेदना व्यक्त केल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुरेश कलमाडींच्या निधनामुळे राज्याचे एक अनुभवी ज्येष्ठ नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त केली आहे. रामदास आठवले, जितेंद्र आव्हाड यांच्यासह अनेकांनी शोकसंवेदना व्यक्त केल्यात.

## वादग्रस्त वक्तव्य आणि चव्हाणांचा माफीनामा

रवींद्र चव्हाणांच्या वक्तव्यावर रितेश देशमुखांचे प्रत्युत्तर : अमित देशमुखांचाही पलटवार



■ **वृत्तसंस्था, लातूर, दि. ६ :**
महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूरमधून पुसल्या जातील, असे वादग्रस्त वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. या वक्तव्यामुळे लातूरसह संपूर्ण मराठवाड्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, विलासराव देशमुखांवर प्रेम करणाऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. याच पार्श्वभूमीवर विलासराव देशमुख यांचे पुत्र आणि अभिनेता रितेश देशमुख यांनी संयम राखत रवींद्र चव्हाण यांना प्रत्युत्तर दिले आहे.



लातूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीा सभेत विलासराव देशमुख यांच्या आठवणी या शहरातून पुसल्या जातील, यात शंका नाही, असे विधान केले. चव्हाण यांच्या या वक्तव्याला काँग्रेस कार्यकर्त्यांनी विरोध दर्शवला.
या सगळ्या घडामोडींनंतर रितेश देशमुख यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत सांगितले, लोकांसाठी जगलेल्या माणसांची नावं मनावर कोरलेली असतात. लिहिलेलं पुसता येतं, कोरलेलं नाही.
दुसरीकडे, लातूर मधील प्रत्येक माणसाच्या जीवनाला विलासराव देशमुख साहेब यांचा स्पर्श झालेला आहे, प्रत्येकाच्या मनावर त्यांची आठवण कोरलेली आहे, त्यामुळे बाहेरच्यांनी कोणीतरी येऊन सांगितल्यामुळे ही आठवण कदापिही पुसली जाणार नाही, याची जाणीव भाजपच्या नेत्यांनी ठेवायला हवी होती, अशा शब्दांत अमित देशमुख यांनीही चव्हाण यांच्यावर पलटवार केला आहे. दरम्यान, सर्व स्तरातून टीकेची झोड उठत असताना अखेर रवींद्र चव्हाण यांनी दिलगिरी व्यक्त केली. त्यांच्या मुलांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करत असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे.

## भाजपच्या प्रचारसभांमध्ये महिलांचा नाच?

ठाकरे गटाकडून व्हिडीओ व्हायरल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
मुंबई महापालिकेच्या निवडणूक प्रचारसभेत महिलांना नाचवून गर्दी जमवली जात असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अखिल चित्रे यांनी केला आहे. त्यांनी मंगळवारी यासंदभार्तील व्हिडीओ एक्स या समाज माध्यमातून व्हायरल करत भाजपवर निशाणा साधला आहे.
हा व्हिडीओ पहा, तुमच्या तळपायाची आग मस्तकात जाईल. कारण भाजप मुंबईत प्रचारसभांमध्ये महिलांना नाचवून गर्दी जमवत आहे. आणि हे करताना भाजपच्या महाभागांना भान नाही की मागे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि देशाला संविधान देणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा आहेत. आमच्या महापुरुषांपुढे बायका नाचवता, कुठे नेऊन ठेवला आहे आमचा महाराष्ट्र? असा सवाल चित्रे यांनी केला आहे.
कार्यक्रमाच्या आयोजक कोण? तर भाजपचा स्थानिक उमेदवार आणि संयोजक कोण तर सिद्धिविनायक ट्रस्टवर भाजपने कोषाध्यक्ष नेमलेला पवन त्रिपाठी. ही असली माणसं आमच्या पवित्र मंदिरावर नेमताना लाज कशी वाटली नाही भाजपला? असा सवालही त्यांनी केला आहे.


## राहुल गांधी.. हाजिर हो! कोर्टाचे फर्मान



■ **वृत्तसंस्था, सुलतानपूर, दि. ६ :**
गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात मंगळवारी सुलतानपूर येथील न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीनंतर न्यायालयाने राहुल गांधींना समन्स बजावले आहे. त्यांना १९ जानेवारी रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे.
राहुल यांनी २०१८ मध्ये कर्नाटक निवडणुकीदरम्यान म्हटले होते की, जो पक्ष प्रामाणिकपणाबद्दल बोलतो, त्याचा अध्यक्ष हत्येचा आरोपी आहे. यानंतर सुलतानपूरचे भाजप नेते विजय मिश्रा यांनी ४ ऑगस्ट २०१८ रोजी राहुल यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता.

## मुख्यमंत्र्यांनी खम ठोकली!

गुरुवारी नागपूरमध्ये थेट जनतेशी संवाद



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ६ :**
महापालिका निवडणुकीत भाजपने ५१ माजी नगरसेवकांचे तिकीट कापत उमेदवारी नाकारली. यामुळे नाराज झालेल्या अनेक माजी नगरसेवकांनी आता भाजप उमेदवारांविरोधात छुपी मोहीम सुरू केली आहे. यामुळे अनेक प्रभागात भाजपला धोका निर्माण झाला आहे.
यावर्षी भाजपने नागपूर मनपात १२० जागांचे लक्ष्य ठेवले असून, थेट मुख्यमंत्र्यांनीच दंड थोपटले आहेत. जाहीर सभा आणि पदयात्रांसह आता मुख्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार आहेत. यासाठी गुरुवार ८ जानेवारीला हॉटेल सेंटर पॉइंट येथे जनतेशी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून येथे मुख्यमंत्री लोकांना प्रश्नांना उत्तरे देणार आहेत.
नागपूर महापालिकेच्या १५१ जागांसाठी निवडणूक होत आहे. यापैकी १४३ जागांवर भाजप स्वतः लढत असून ८ जागा शिंदेसेनेसाठी सोडण्यात आल्या आहेत. भाजपने ऐनवेळी काँग्रेसमधून पक्षात आलेल्या तीन माजी नगरसेवकांना उमेदवारी दिली तर प्रभागाबाहेरच्या लोकांना उमेदवारी दिल्याने पक्षामध्येही मोठी नाराजी आहे. भाजपमधील काही लोकांनी अपक्षांची साथ देत पक्षविरोधी भूमिका घेतली आहे.
या नाराजीचा फटका भाजपला बसण्याची शक्यता असल्याने आता थेट मुख्यमंत्र्यांनीच राज्यासह नागपूर महापालिकेला निवडणुकीतही सक्रीय सहभाग घेतला आहे. याचाच भाग म्हणून मुख्यमंत्र्यांनी थेट आता जनतेशी संवाद साधणार आहेत.

## २ कोटी ३३ लाखांची रोकड जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
मुंबईसह विविध महानगरांमध्ये संशयास्पद वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांना प्रभावित करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांसाठी अवैध पैशांची देवाणघेवाण होऊ नये, यासाठी प्रशासन डोळ्यात तेल घालून काम करत आहे.
याच कडक बंदोबस्ताचा भाग म्हणून मुंबईतील देवनार परिसरात निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने मोठी कारवाई केली आहे. एका संशयास्पद वाहनाची तपासणी केली असता, त्यात तब्बल २ कोटी ३३ लाख रुपयांची रोख रक्कम सापडल्याने खळबळ उडाली आहे. पथकाने ही सर्व रोकड तातडीने ताब्यात घेतली असून, ही रक्कम नेमकी कोणाची आहे आणि ती कुठे नेली जात होती, याचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. आचारसंहितेच्या काळात इतकी मोठी रक्कम सापडल्याने पोलीस आणि निवडणूक विभागाकडून कडक तपासणी केली जात आहे.







# एकनाथ शिंदेचा मुंबईसाठी मास्टर प्लॅन



वचननाम्यात लाडकी बहीण केंद्रस्थानी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना लवकरच आपला महत्त्वाकांक्षी वचननामा जाहीर करणार असल्याची माहिती समोर आली आहे. स्वच्छ, सुंदर आणि नियोजित मुंबई उभारण्याच्या उद्देशाने हा वचननामा तयार करण्यात आला असून, शासनाकडून मंजूर करून घेतलेल्या विकासकामांसह अनेक नव्या योजनांचा यात समावेश असणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सर्व वयोगटांतील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन या वचननाम्याची आखणी करण्यात आली असून, लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत तो अधिकृतरित्या जाहीर केला जाणार आहे. विशेष म्हणजे शिवसेनेच्या वचननाम्यातील काही महत्त्वाचे मुद्दे आधीच माध्यमांच्या हाती लागले असून, त्यामुळे राजकीय वतुर्ळात चर्चा रंगू लागली आहे.

महिलांच्या प्रश्नांना या वचननाम्यात केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला होता. आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी जाहीर होणाऱ्या वचननाम्यात महिलांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्नांवर भर देण्यात आला आहे. विशेषतः महिलांमध्ये वाढत असलेल्या कर्करोगाच्या प्रमाणाचा विचार करून महिलांसाठी कर्करोगावरील औषधे मोफत देण्याचा निर्णय यात समाविष्ट आहे. याशिवाय स्तनाच्या कर्करोगासंदभार्तील सर्व तपासण्या मोफत करण्याची घोषणा वचननाम्यात करण्यात येणार असल्याची माहिती आहे. महिलांच्या आरोग्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठीही शिवसेनेचा वचननामा ठोस आश्वासने देणारा आहे. एम्सच्या धर्तीवर परळ येथील केईएम रुग्णालय अत्याधुनिक यंत्रणांनी सुसज्ज करण्यात येणार आहे. या प्रकल्पानंतर टप्प्याटप्प्याने मुंबई महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयांनाही आधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज मिळेल, असा दावा शिवसेनेकडून केला जात आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील ही सुधारणा मुंबईसाठी महत्त्वाची ठरणार आहे.

तरुणांसाठी शिक्षणाच्या संधी वाढवण्यावरही वचननाम्यात भर देण्यात आला आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे विद्यापीठाची स्थापना करून या विद्यापीठाअंतर्गत विविध डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम सामान्य पदवी अभ्यासक्रमांच्या तुलनेत कमी शुल्कात उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती आहे. यामुळे आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या तरुणांना मोठा फायदा होणार आहे. रोजगाराभिमुख शिक्षण देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

मुंबईतील वाढते प्रदूषण ही मोठी समस्या लक्षात घेऊन पर्यावरण संरक्षणासाठीही मोठ्या घोषणा वचननाम्यात करण्यात येणार आहेत. सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात सात एअर प्युरिफायर कार्यरत आहेत. भविष्यात प्रदूषण नियंत्रणासाठी मुंबईत 60 एअर प्युरिफायर उभारले जाणार असल्याची घोषणा करण्यात येणार आहे. तसेच वायुप्रदूषण रोखण्यासाठी बेस्टच्या ताफ्यात 5 हजार मिनी ई-बेस्ट बसेस दाखल केल्या जाणार आहेत. यामुळे प्रदूषणासोबतच सार्वजनिक वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

जलप्रदूषण आणि पायाभूत सुविधांच्या दृष्टीनेही वचननामा महत्त्वाच्या उपाययोजना सुचवतो. मिठी नदी पुनर्जीवन प्रकल्प हाती घेण्यात येणार असून, मिठी, दहिसर, पोईसर आणि ओशिवरा या मुंबईतील चार प्रमुख नद्यांवरील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची व्याप्ती वाढवली जाणार आहे. याशिवाय झोपडपट्टी भागांमध्येही छोटे एसटीपी प्रकल्प उभारले जाणार असून, त्यामुळे जलप्रदूषण कमी होण्यास मदत होईल. खड्डेमुक्त मुंबईसाठी सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे केले जात असताना, वीज, पाणीपुरवठा, गॅस आणि केबलसारख्या उपयुक्त सेवांसाठी भूयारी प्रकल्प राबवले जाणार आहेत, ज्यामुळे वारंवार रस्ते खोदण्याची गरज भासणार नाही.

मुंबईतील पुनर्विकास आणि वाहतूक व्यवस्थेबाबतही शिवसेनेचा वचननामा मोठी दिशा दाखवणारा आहे. पागडी इमारतींचा न्याय्य आणि सुयोग्य पुनर्विकास करण्यासाठी स्वतंत्र नियमावली करण्याची ऐतिहासिक घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनात केली होती. मुंबईत 19 हजारांहून अधिक सेस किंवा पागडी इमारती असून, फनेल झोनमुळे रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी नवीन योजना आणली जाणार आहे. त्याचबरोबर 50 एकर किंवा त्याहून मोठ्या खाजगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर एकत्रित झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबवली जाणार असून, पहिल्या टप्प्यात मुंबईतील 17 प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे.

## आमची जुनी पाने उलटण्याची इच्छा नाही



बावनकुळेंचा अजितदादांना इशारा

■ पुणे : राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी केलेल्या एका विधानामुळे भाजपनेते आक्रमक झाले आहेत. आम्ही मागची पाने चाळली तर दादांना बोलता येणार नाही. तसेच 70 हजार कोटींचा निकाल अद्याप लागलेला नाही, अशा कडक शब्दांत चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना थेट इशारा दिला आहे. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत सत्ताधारी महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या दोन प्रमुख पक्षांत 'तू-तू मैं-मैं' सुरू झाली आहे. पिंपरी-चिंचवडमधील एका पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर निशाणा साधताना, माझ्यावर 70 हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले, हे सर्वांना माहित आहे. मात्र, ज्यांनी हे आरोप केले त्यांच्यासोबतच मी आज सरकारमध्ये बसलो आहे. असे म्हटले होते. अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे भाजपची काहीशी कोंडी झाली होती. या विधानानंतर भाजपच्या गोटातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना इशारा दिला आहे.

अजित पवारांच्या विधानाचा समाचार घेताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना आरसा दाखवण्याचा प्रयत्न केला. "70 हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा काही अभिमानास्पद नाही. या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी सुरू आहे आणि अद्याप निकाल लागलेला नाही. त्यामुळे न्यायालयात काय होईल, त्यावर पुढची दिशा ठरेल. अजित दादा हे प्रगल्भ नेते आहेत, त्यांनी एका महापालिकेच्या निवडणुकीसाठी महायुतीत मनभेद निर्माण होतील असे वागू नये," असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणालेत.

## राष्ट्रवादीच्या २ गटांत अहिल्यानगरात वाद

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ६ :

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर येथील एका उमेदवाराला सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही लोकांनी पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावल्याची घटना घडली आहे. याकामी पोलिसांची मदत घेण्यात आल्याचा आरोप झाल्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. सदर उमेदवाराने एका व्हिडिओद्वारे आपल्यावर गुदरलेला प्रसंग कथन करत न्यायाची मागणी केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानेही या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, रामदास विठ्ठल माने असे शरद पवार गटाच्या पीडित उमेदवाराचे नाव आहे. ते अहिल्यानगरच्या प्रभाग क्रमांक 1 मधून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्या कार्यकर्त्यांवर पिस्तुल दाखवून धमकावल्याचा आरोप केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी त्यांचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात ते निवडणुकीच्या प्रचारात आपल्याला कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे याची उजळणी करत आहेत.

रामदास माने आपल्या व्हिडिओत म्हणतात, मी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून प्रभाग क्रमांक 1 मधून अहिल्यानगर महापालिकेची निवडणूक लढवत आहे. ही निवडणूक लढवत असताना मला विविध अडथळे येत आहेत. माझ्या मागे प्रतिस्पर्धी पक्षांचे कार्यकर्ते येतात. गन दाखवतात. मागील 3 ते 4 दिवसांपासून मला गन दाखवणे, उमेदवारी अर्ज मागे घे म्हणून धमकावणे, माझ्या प्रचारात विविध अडथळे आणण्याचे प्रकार घडत आहेत.

## सावरकरांचे विचार मान्य असतील तर सोबत या



■ पुणे : आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर महायुतीतील मित्रपक्षांमधील सख्य संपल्याचे चित्र दिसत आहे. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी अजित पवार यांच्यावर सडकून टीका करत त्यांना सावरकरांच्या मुद्द्यावरून आरसा दाखवला आहे. "तुम्हाला सावरकरांचे विचार मान्य असतील, तर तुमच्या बरोबर, नाहीतर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करू," अशा अत्यंत कडक शब्दांत शेलारांनी अजित पवारांना ठणकावले आहे.

भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचा उल्लेख केल्यानंतर अजित पवार यांनी टीका केली होती. या टीकेला उत्तर देताना आशिष शेलार यांनी उपरोक्त इशारा दिलेला आहे. ते म्हणाले, आमचा पक्ष स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांवर चालणारा आहे. रवींद्र चव्हाण म्हणालेच आहेत की आम्ही सावरकरांचे भक्त आहोत. सावरकरी विचारांवर चालणारे लोक आहोत. त्यामुळे अजित पवारांच्या पक्षाला सुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. याल तर तुमच्या बरोबर न याल तर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करु," असा इशारा आशिष शेलार यांनी अजित पवारांना दिला. त्यामुळे महापालिका निवडणुकीच्या आधी भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जुंपण्याची शक्यता आहे.

## रिलेशनशिपला नकार दिल्याने तरुणीवर चाकूहल्ला

■ वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ६ :

प्रेमसंबंधातून झालेल्या वादानंतर पुन्हा एकत्र राहण्यास नकार दिल्याने एका माथेफिरू प्रियकराने तरुणीच्या घरात घुसून तिच्यावर धारदार चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना पुंडलिकनगर परिसरात घडली आहे. या हल्ल्यात १८ वर्षांची तरुणी गंभीर जखमी झाली असून आरोपीने तिला जिवे मारण्याची धमकीही दिली आहे. याप्रकरणी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित १८ वर्षांची तरुणी बारावीची विद्यार्थिनी असून ती आपल्या आईसोबत राहते. आरोपी कृष्णा ऊर्फ सोनाराचा भय्या शेषनारायण उदावंत (रा. अजिंक्यनगर, हिंदू राष्ट्र चौक) आणि पीडितेची ओळख चार वर्षांपूर्वी झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाल्यानंतर ते काही काळ एकत्र राहत होते. मात्र, दोन महिन्यांपूर्वी त्यांच्यात वाद झाल्याने पीडिता आपल्या आईकडे परतली होती. जखमी विद्यार्थिनीने दिलेल्या फियार्दीवरून पोलिसांनी कृष्णा उदावंतविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार केशव कसारे करत आहेत. ऐन परीक्षेच्या काळात विद्यार्थिनीवर झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

४ जानेवारी रोजी दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास कृष्णा पीडितेच्या घरी आला. माझ्यासोबत पुन्हा राहायला चल, असा तगादा त्याने लावला. मात्र, पीडितेने ठाम नकार दिल्याने तो संतप्त झाला. त्याने सुरुवातीला स्वतःच्या गळ्याला धारदार शस्त्र लावून आत्महत्येची धमकी दिली. तरीही पीडिता डगमगली नाही, हे पाहून त्याने रागाच्या भरात तिच्या दंडावर सपासप वार केले. हल्ला केल्यानंतर पुन्हा जेथे भेटशील तेथे तुला जिवे मारून टाकीन, अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

## पिसाळलेल्या कुत्र्याचा थरार : ४० जणांना चावा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ६ :

चाकण शहरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने ३५ जणांना तसेच काही कुत्र्यांना चावा घेतला. लोकांनी या कुत्र्याला ठार मारले. पण ज्या इतर कुत्र्यांना त्याने चावा घेतला तीसुद्धा पिसाळली आणि त्यांनी आणखी ५ जणांना चावा घेतला. हा थरार रविवारी ( ४ जानेवारी) दिवसभर चाकण शहरात घडत होता.

काही गंभीर जखमी झालेल्या नागरिकांना चाकण ग्रामीण रुग्णालयात उपचार न मिळाल्याने पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण रुग्णालय आणि पुण्यातील ससून रुग्णालयात पाठवले होते. या घटनेमुळे चाकणकर भयभीत झाले आहेत. एका पिसाळलेल्या कुत्र्याणे चाकणच्या आंबेठाण रस्त्यावर दिसेल त्या नागरिकाच्या अंगावर झडप मारत चावा घेतला. शिवाय इतर भटक्या कुत्र्यांनाही तो चावत सुटला. शहरात पुढे महात्मा फुले चौक, श्री शिवाजी विद्यामंदिर, मार्केट यार्ड भागात हा कुत्रा पोहोचला. येथेही त्याने महिला, लहान मुले, वृद्धांना चावा घेतला.

एकूण ३५ जणांवर त्याने हल्ला करून रक्तबंबाळ केले. कुत्रे अंगावर आल्यानंतर अनेक ज्येष्ठ पळताही आले नाही.



त्याने अनेकांच्या पायाला, पोटरीला आणि हाताला चावा घेतला.

कुत्र्याचा हैदोस सुरू असताना चाकण पालिका प्रशासनाने काहीही केले नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत असतानाच चाकण ग्रामीण रुग्णालयाने लस नसल्याचे सांगत जखमींना पिंपरी आणि पुण्याला पाठवले. काहींनी खासगी रुग्णालयात धाव घेतली. मात्र तिथेही लस उपलब्ध नसल्याने त्यांनाही पुणे आणि पिंपरीला जावे लागले. सायंकाळी चाकण ग्रामीण रुग्णालयात लस आल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कांबळे यांनी सांगितले.

सकाळपासून कुत्र्याचा सुरू असलेला हैदोस दुपारी त्याला ठार केल्यानंतरच थांबला. दुपारी काही नागरिकांनी घेरून या कुत्र्याला ठार मारले. पण ज्या अन्य कुत्र्यांना या पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतला होता त्या कुत्र्यांनी सायंकाळपर्यंत शहरात ५ जणांना चावा घेत जखमी केले आहे.

वाढता मानव-श्वान संघर्ष आणि पर्यटकांच्या सुरक्षेचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची निवासस्थाने, हॉटेल्स, रिसॉर्ट आणि पर्यटनस्थळांवर कुत्रे येणार नाहीत यासाठी उपाययोजना केल्या जातील. त्यासाठी एसओपी तयार करून स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून प्रभावी कार्य नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी ६ प्रादेशिक उपसंचालकांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी पर्यटन संचालनालयाच्या सहसंचालकांना नियंत्रण अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

## अजित दादा जनता खुळी नाही चंद्रकांत पाटलांचा पवारांवर पलटवार



■ पुणे : राज्यातील महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत सत्तेतील मित्रपक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यातच आता जुंपल्याचे पाहायला मिळत असून, विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये उभय पक्षांतील संघर्ष शिगेला पोहोचला आहे. अजित पवारांनी भाजपचा उल्लेख 'भ्रष्टाचारी' असा केल्याने संतापलेल्या भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी, 'मुख्यमंत्री आणि गृहमंत्री आमच्याकडे आहेत, हे विसरू नका' असा थेट इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर, आता पुन्हा एकदा पाटील यांनी अजित पवारांवर घणाघाती टीका केल्याने महायुतीतील या दोन पक्षांमधील कलगीतुरा अधिकच रंगतदार वळणावर येऊन ठेपला आहे.

पुण्यातील महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित प्रचारसभेत बोलताना चंद्रकांत पाटील यांनी अजित पवारांच्या कार्यकाळात पुण्यात आणि पिंपरी चिंचवडमध्ये काय विकास झाला, असा सवाल उपस्थित केला आहे. ते म्हणाले, पुणे मेट्रो आणि उड्डाणपूल हे आमच्या काळात झाले. नगरपालिका निवडणुकीत आपण विजय मिळवला, आता 15 तारखेला मतदान करून पुण्यात भाजपचा महापौर होणार आहे, असे पाटील म्हणाले.

## अंबरनाथमध्ये मोठा राजकीय भूकंप : भाजपचा शिंदे गटाला धक्का

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

ठाणे जिल्ह्याच्या जिल्ह्याच्या राजकारण मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या सत्तेच्या समीकरणात मोठी उलथापालथ झाली असून सत्तेसाठी भारतीय जनता पक्षाने शिंदेसेनेला बाजूला ठेवून चक्क काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्याशी हातमिळवणी केली आहे. या नव्या युतीमुळे शिवसेना शिंदे गट 23 जागांवर विजय मिळवून देखील सत्तेपासून दूर फेकली गेली आहे.

अंबरनाथ नगरपरिषदेच्या एकूण ५९ जागांपैकी बहुमतासाठी ३० जागांची आवश्यकता होती. निवडणुकीत भाजपच्या तेजश्री करंजुले नगराध्यक्षपदी निवडून आल्या असल्या, तरी भाजपला बहुमत मिळाले नव्हते. सत्तेचा आकडा गाठण्यासाठी भाजपने स्वतःचे 16, काँग्रेसचे 12 आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे 4 अशा एकूण 32 नगरसेवकांची मोट बांधत अंबरनाथ नगर परिषदेत सत्ता स्थापन केली आहे. या अजब समीकरणामुळे 'काँग्रेसमुक्त भारत'चा नारा देणाऱ्या भाजपने अंबरनाथमध्ये मात्र सत्तेसाठी काँग्रेसची साथ घेतल्याने राजकीय वतुर्ळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

भाजप आणि काँग्रेस एकत्र आल्याने शिवसेना शिंदे गट कमालीचा संतप्त झाला आहे. अंबरनाथचे आमदार बालाजी किणीकर यांनी या युतीवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. "एकीकडे काँग्रेसमुक्त भारताच्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे सत्तेसाठी काँग्रेससोबत हातमिळवणी करायची, ही शुद्ध फसवणूक आहे. भाजपने



शिवसेनेचा घात केला असून ही युती अत्यंत अभद्र आहे," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. शिवसेनेच्या टीकेला भाजपचे उपाध्यक्ष गुलाबराव करंजुले पाटील यांनी तितक्याच धारदार शब्दांत उत्तर दिले आहे.

## ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या आईचा आत्महत्येचा प्रयत्न

■ वृत्तसंस्था, सांगली, दि. ६ :

राज्यातील २९ शहरांमध्ये मिनी विधानसभा मानल्या जाणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचा धुरळा उडालेला असतानाच, सांगलीत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या एका उमेदवाराला उमेदवारी मागे घेण्यासाठी धमकावण्यात आल्याचा आरोप होत आहे. या सततच्या दबावाला कंटाळून संबंधित उमेदवाराच्या आईने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर सांगलीच्या राजकीय वातावरणात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.

सांगलीतील प्रभाग क्रमांक १६ मध्ये शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत. सोमवारी या उमेदवाराच्या आईने विष प्राशन केले. त्यांना तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडीकडून या उमेदवारावर उमेदवारी मागे घेण्यासाठी प्रचंड दबाव टाकला जात होता. या त्रासाला कंटाळूनच त्यांच्या आईने हे टोकाचे पाऊल उचलले, असा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.

या घटनेचे वृत्त समजताच दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी सांगलीच्या शासकीय रुग्णालयाबाहेर मोठी गर्दी केली होती. यावेळी दोन्ही गटांमध्ये जोरदार वादावादी आणि घोषणाबाजी झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी वेळीच मध्यस्थी केल्याने पुढील अनर्थ टळला. सध्या रुग्णालयाबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या घटनेनंतर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या उषाताई जाधव यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. "आमच्या उमेदवाराला प्रचारापासून रोखले जात आहे. त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर प्रचंड दबाव असून मोठी दहशत निर्माण केली जात आहे. माझ्याकडे या दडपशाहीचे ऑडिओ कॉल रेकॉर्डिंग्स देखील उपलब्ध आहेत. जर हिंमत असेल तर समोरासमोर लढा, अशी भेकडासारखी दमदाटी करू नका," अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना इशारा दिला.

### राज ठाकरेंनी त्यांचा पक्ष ठाकरे सेनेमध्ये सिरेंडर केला

## संतोष धुरींचा भाजपमध्ये प्रवेश



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर मनसेला बसलेला धक्का आता थेट आरोपांच्या रणधुमाळीत बदलला आहे. भाजपमध्ये अधिकृत प्रवेश करताच माजी नगरसेवक संतोष धुरी यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. राज ठाकरे यांनी आपला पक्ष ठाकरे सेनेसमोर सरेंडर केला आहे, तर उद्धव ठाकरे हे कोत्या मनाचे नेते आहेत, असा गंभीर आरोप करत धुरी यांनी मनसेशी सर्व संबंध तोडल्याची स्पष्ट घोषणा केली. अमित साटम यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेशाने केवळ मनसेच नव्हे, तर ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीच्या चर्चांनाही मोठा धक्का दिला आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचाली वेगाने घडत असताना मनसेसाठी परिस्थिती अधिकच बिकट होताना दिसत आहे. कालपर्यंत राज ठाकरे यांचे कट्टर समर्थक आणि निष्ठावंत मनसैनिक म्हणून ओळखले जाणारे माजी नगरसेवक संतोष धुरी यांनी अखेर भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला आहे. मात्र हा प्रवेश केवळ पक्षांतरापुरता मर्यादित न राहता, ठाकरे बंधूंवर थेट आरोपांच्या फैरी झाडणारा ठरला आहे. भाजपमध्ये दाखल होताच धुरी यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप करत मनसेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांच्या उपस्थितीत दुपारी संतोष धुरी यांचा भाजप प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी बोलताना धुरी यांनी स्पष्ट शब्दांत मनसे नेतृत्वावर नाराजी व्यक्त केली. राज ठाकरे यांनी त्यांचा पक्ष ठाकरे सेनेमध्ये सरेंडर केला आहे. मनसेची स्वतंत्र ओळखच संपवण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप त्यांनी केला. यासोबतच उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधत, उद्धव ठाकरे हे कोत्या मनाचे नेते आहेत. कार्यकर्त्यांची कदर त्यांच्याकडे नाही, असा घणाघात त्यांनी केला.

## ११५ कोटींच्या ड्रग्ज प्रकरणात रेड शेडवर नाही

■ वृत्तसंस्था, सातारा, दि. ६ :

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या साताऱ्यातील दरे गावाजवळील सावरी परिसरात 115 कोटी रुपयांचा आणि सुमारे 45 किलो वजनाचा ड्रग्ज साठा जप्त झाल्याची घटना समोर आल्यानंतर हे प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर व वादग्रस्त बनत चालले आहे. मुंबई पोलिसांनी केलेल्या या कारवाईनंतर संबंधित हॉटेल आणि मालमत्तेच्या मालकीबाबत प्रश्न उपस्थित झाले होते.

ही मालमत्ता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सख्खे भाऊ प्रकाश शिंदे यांच्या मालकीची असून तिची देखभाल दरे गावचे सरपंच रणजीत शिंदे करत



असल्याची माहिती समोर आली होती. मात्र, या संपूर्ण प्रकरणात दबावामुळे कारवाई थंडावल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाकडून सातत्याने केला जात आहे. या प्रकरणाला आता नवे वळण देत शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या

### सुषमा अंधारेंचा गौप्यस्फोट

सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेऊन अनेक गंभीर आरोप आणि प्रश्न उपस्थित केले आहेत.

सुषमा अंधारे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सावरी, जिल्हा सातारा येथे ड्रग्जसंदर्भात धाड पडून जवळपास महिना लोटला असतानाही अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. मुलुंड आणि वर्धा येथे धाड पडल्याची माहिती तत्काळ जाहीर झाली होती, पुण्यातून विशाल मोरे याला अटक झाल्याचंही कळालं होतं. मात्र, 115 कोटींच्या ड्रग्जसारख्या मोठ्या प्रकरणात ना पत्रकार परिषद, ना सीसीटीव्ही फुटेज, ना जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती पुढे येत असल्याने संशय अधिक गडद होत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

सुषमा अंधारे यांनी प्रकाश शिंदे यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, प्रकाश शिंदे हे या प्रॉपटीर्शी आपला संबंध नसल्याचं सांगत असून, ती मालमत्ता विकल्याचा दावा करत आहेत. मात्र, हा दावा खोटा असल्याचा आरोप अंधारेंनी केला. त्यांनी उदाहरण देत सांगितले की, शाहरुख खानच्या मुलाच्या प्रकरणात केवळ काही ग्रॅम ड्रग्ज सापडले असतानाही मोठ्या प्रमाणावर कारवाई आणि पत्रकार परिषदा झाल्या.

## दहिसरमध्ये निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राडा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

मुंबईत महापालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दहिसर पश्चिम परिसरात सोमवारी सायंकाळी मोठा राडा झाला. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराच्या प्रचार फेरीत सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनी घरात घुसून दोन व्यक्तींना लाथा-बुक्क्यांनी आणि चक्क पक्षाच्या झेंड्यांच्या काठीने मारहाण केली.

या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून, पोलिसांनी ८ ते १० कार्यकर्त्यांविरोधात मध्यरात्री गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, हा सर्व प्रकार ठाकरे गटाने केल्याचा आरोप शिंदेसेनेचे विभागप्रमुख राम यादव यांनी केला.



# इंदूरहून अमरावतीत आला लाखो रुपयांचा गुटखा

**गुन्हे शाखेचा ट्रान्सपोर्ट नगरमध्ये छापा | 29.43 लाखांचा मुद्देमाल जप्त**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - महाराष्ट्रात निर्बंधींत असलेल्या गुटख्याच्या तस्करीला गुन्हे शाखेने मोठा धक्का दिला आहे. इंदूरहून अमरावतीत आणण्यात आलेली गुटख्याची खेप नागपुरी गेट पोलिस स्टेशन हद्दीतील ट्रान्सपोर्ट नगर परिसरात पकडण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी 14.43 लाखांचा बंदी असलेला गुटखा व सुगंधित तंबाखू तसेच 15 लाख किमतीचा आयशर ट्रक असा एकूण 29.43 लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही धडक कारवाई मंगळवारी (दि. 6) रोजी करण्यात आली.

क्राईम ब्रँचचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली होती की वलगाव रोडवरील ट्रान्सपोर्ट नगरमध्ये डायमंड ट्रान्सपोर्टसमोर उभा असलेला एमएच 15 / ईई 1877 क्रमांकाचा आयशर ट्रक सामान्य मालाच्या आड बंदी असलेला गुटखा व सुगंधित तंबाखू घेऊन आला असून तो लवकरच उतरवण्यात येणार आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी छापा टाकला.

तपासादरम्यान ट्रक चालकाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता ट्रकमध्ये गुटखा असल्याची कबुली त्याने दिली. हे प्रकरण अन्न व औषध प्रशासनाशी संबंधित असल्याने तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पंचनामा करून विविध कंपन्यांचा बंदी घातलेला गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त केला. जप्त केलेल्या प्रतिबंधित पदार्थांची किंमत 14 लाख 43 हजार 620 असून आयशर ट्रकची किंमत सुमारे 15 लाख आहे.

या प्रकरणात एकूण 6 आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यापैकी ट्रक चालक ईश्वर भगवान सिंग सूर्यवंशी (रा. अहेरखेडी, इंदूर, मध्य प्रदेश) व अब्दुल सलीम अब्दुल कादिर (वय 35, रा. ट्रान्सपोर्ट नगर, अमरावती) यांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात ही खेप इंदूर येथील रहिवासी अवध किशोर पांडे याने पाठवली असल्याचे निष्पन्न झाले असून ती दानिश (माऊली, अमरावती), साजिद (नेर, यवतमाळ) व साईराम (यवतमाळ) यांच्याकडे पाठवण्यात आली होती. अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम दंडे यांच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलीस ठाण्यात संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सय्यद नाझीम, रणजीत गावंडे, चालक प्रभात पोकळे तसेच अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी घनश्याम दंडे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# थिनॉल कारखान्यात स्फोटांची मालिका

**एमआयडीसीत रासायनिक आगीचा थरार | तरुण महिला कामगाराच्या जाग्यावरच होरपळून मृत्यू**









### सहा महिला थोडक्यात बचावल्या

प्रतिभा रवी राऊत, रोशनी संदीप मेहरे, उज्ज्वला रवी सुखदेवे, वर्षा विनोद भगत, मंदा अशोक रामटेके आणि शुभांगी अक्षय ढोरे या सहा महिला कामगारांनी प्रसंगावधान राखत तात्काळ बाहेर धाव घेतल्याने त्यांचे प्राण वाचले.

### कामगारांमध्ये संताप

अत्यंत ज्वलनशील थिनॉल व टरपेंटाईनसारखी केमिकल्स साठवूनही पुरेशा फायर सेफ्टी यंत्रणा, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग व सुरक्षा उपाय नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. औद्योगिक सुरक्षेतील निष्काळजीपणामुळेच एका तरुणीचा बळी गेला, असा तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### गुन्हा दाखल; मालक ताब्यात

राजापेठ पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून कंपनी मालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. आगीचे नेमके कारण, केमिकल साठवणुकीच्या परवानग्या, फायर सेफ्टी नियमांचे पालन झाले होते का, याबाबत सखोल तपास सुरू आहे.

> एमआयडीसीतील आग प्रकरणात कंपनी मालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. टरपेंटाईन केमिकलमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. मृतदेह जळून खाक झाल्याने जागेवरच पीएम करण्यात आले.
>
> **पुनित कुलट,**
> **पोलिस निरीक्षक, राजापेठ ठाणे.**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - शहरातील बडनेरा रोडवरील एमआयडीसी परिसर मंगळवारी सकाळी भीषण दुर्घटनेने हादरून गेला. गोपी इंडस्ट्रीज थिनॉल पेंट प्रायव्हेट लिमिटेड या रसायननिर्मिती करणाऱ्या कारखान्यात सकाळी साडेनऊच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. थिनॉल व टरपेंटाईनने भरलेल्या ड्रममध्ये एकामागोमाग एक स्फोट झाल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड घबराट पसरली. या आगीत मोनाली सुनील कोडापे (वय 29, रा. हरदोली, ता. आर्वी, जि. वर्धा) या तरुण महिला कामगाराचा जागीच करुण अंत झाला.

मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे कारखान्यात महिला व पुरुष कामगार कामावर हजर झाले होते. काही महिला कारखान्याच्या आत काम करत असतानाच अचानक थिनॉल व टरपेंटाईनने भरलेल्या ड्रममधून आग भडकली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण करत एकामागोमाग एक ड्रम फुटू लागले. स्फोटांचे भीषण आवाज इतके प्रचंड होते की संपूर्ण एमआयडीसी परिसर हादरून गेला. आगीचे काळे धुराचे लोट तब्बल एक किलोमीटरपर्यंत हवेत पसरले.

'आग...आग...' असा आक्रोश करत कामगारांनी जीव वाचवण्यासाठी धावपळ सुरू केली. बहुतांश कर्मचारी बाहेर पडण्यात यशस्वी झाले; मात्र गोंधळाच्या परिस्थितीत मोनाली कोडापे आगीच्या विळख्यात अडकली. सहकारी महिला व पुरुष कामगारांनी तिला वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले; परंतु सतत होणारे स्फोट, केमिकल्सचा उग्र वास आणि आगीची तीव्रता पाहता आत प्रवेश करणे अशक्य झाले. स्फोट आणि आग इतकी भीषण होती की, काही वेळातच कारखान्याच्या छतावरील लोखंडी अँगल वाकडे झाले, तर टिनपत्रे उडून बाहेर पडली.

घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिस ठाण्याचे कर्मचारी आणि महानगरपालिका अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशमन दलाची गाडी कारखान्याच्या आवारात सज्ज ठेवण्यात आली.

आग आटोक्यात आल्यानंतर कारखान्याच्या आत मोनालीचा पूर्णपणे जळालेला मृतदेह आढळून आला. आगीची तीव्रता इतकी भीषण होती की मृतदेह ओळखू येण्यासारखा नव्हता. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून पंचनामा करून जागेवरच शवविच्छेदन करण्यात आले.

### गळफास लावून आत्महत्या

**अमरावती** - फ्रेजरपुरा परिसरातील रहिवाशी मुकेळ बोजे याने शनिवारी दुपारी गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेत फ्रेजरपुरा पोलिसांनी मार्ग दाखल करून पुढिल तपास सुरु केला आहे.

# जुन्या वादातून तरुणावर चाकू हल्ला

**फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - फ्रेजरपुरा पोलिस स्टेशन परिसरातील दस्तूर नगर रोडवरील आर.के. बारजवळ जुन्या वादातून एका तरुणावर चाकू हल्ला करण्यात आला. या घटनेत सुशील धरमपाल विघ्ने (वय 35, रा. जनुना) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मयूर कलापांडे, नैतिक, मोहित आणि इतर एक अशा चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुशील विघ्ने व त्यांचा चुलत भाऊ दस्तूर नगर चौकात ऑटोरिक्षा शोधत उभे होते. त्याचवेळी सुनील थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या एका ऑटोरिक्षात गेला. तेथे आधीपासून उभ्या असलेल्या दोन तरुणांनी त्याच्याशी वाद घालण्यास सुरुवात करत शिवीगाळ केली. हा वाद मिटवण्यासाठी सुशील तेथे गेला असता आरोपींनी त्याच्यावर लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर दुसऱ्या ऑटोरिक्षातून आलेल्या दोन तरुणांनी सुशीलच्या कमरेवर व मांडीवर चाकूने वार केले. हल्ला होत असल्याचे पाहून सुनील मदतीसाठी धावला; मात्र आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. या घटनेनंतर जखमी सुशील विघ्ने यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी चार तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# महानगरपालिका निवडणुकीसाठी ईव्हीएम पूर्ण सज्ज

**पारदर्शक, निर्भय आणि शांततामय मतदानासाठी प्रशासनाची व्यापक तयारी**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक पारदर्शक, निर्भय व शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक प्रशासनाने सर्व स्तरांवर व्यापक तयारी पूर्ण केली आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणा (ईव्हीएम) संदर्भातील सर्व नियोजन अंतिम टप्प्यात असून, संपूर्ण प्रक्रिया निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतदान प्रक्रिया सुरक्षित, विश्वासार्ह व सुलभ व्हावी, यासाठी आधुनिक ईव्हीएम प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. यंदाच्या निवडणुकीत 16-बटनची बॅलेट युनिट वापरण्यात येणार असून, प्रत्येक मतदान केंद्रावर एक कंट्रोल युनिट (सीयू) उपलब्ध राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात एकूण 805 मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या सर्व केंद्रांसाठी आवश्यक त्या ईव्हीएम यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आल्या असून, निवडणूक व्यवस्थेसाठी 805 कंट्रोल युनिट्स आणि 3,320 बॅलेट युनिट्स सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

मतदानापूर्वी ईव्हीएमची प्रथम व द्वितीय स्तरीय तपासणी (एफएलसी) करण्यात येणार असून, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मॉक पोल घेतले जाणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधण्यात आला असून, प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक ते सुरक्षाबळ तैनात राहणार आहे. मतदारांनी निर्भयपणे व उत्साहाने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

महानगरपालिका निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव ठरणार असून, ईव्हीएमच्या माध्यमातून पारदर्शक व विश्वासार्ह मतदान प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**ईव्हीएम व्यवस्थेचा आढावा**

मतदान केंद्रे : 805
कंट्रोल युनिट (सीयू) : 805
बॅलेट युनिट (बीयू) : 3,320
बॅलेट युनिट प्रकार : 16-बटन

**उमेदवार ओळखीसाठी बॅलेट पेपर रंग (गटनिहाय)**

अ गट : पांढरा
ब गट : फिक्कट गुलाबी
क गट : फिक्कट पिवळा
ड गट : फिक्कट निळा

# भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण 8 जानेवारीला अमरावती दौऱ्यावर



**अमरावती** - आगामी 15 डिसेंबर रोजी होणाऱ्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण येत्या 8 जानेवारी रोजी अमरावती शहराच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान शहर भाजपाच्या वतीने स्थानिक दसरा मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेला ते संबोधित करणार असून, महापालिका निवडणुकीत भाजपातर्फे उमेदवारी देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेणार आहेत. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांकडून जोरदार तयारी सुरू असून, सभेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. पक्ष संघटन मजबूत करण्याबरोबरच आगामी निवडणुकीत भाजपाचा विजय सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

# अमरावती-पुणेसह 20 प्रवासी गाड्या रद्द

**4 ते 25 जानेवारीदरम्यान प्रवाशांना फटका**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - विदर्भातून मुंबई व पुण्याकडे रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही महत्त्वाची बातमी आहे. मध्य रेल्वेच्या अखत्यारीतील दौंड-मनमाड रेल्वेमार्गावर काष्टी स्थानक परिसरात दुहेरीकरणाचे काम सुरू असल्याने 4 ते 25 जानेवारीदरम्यान तब्बल 22 दिवस अनेक महत्त्वाच्या प्रवासी गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये अमरावती-पुणे एक्सप्रेससह बडनेरा मार्गे धावणाऱ्या दीर्घ पल्ल्याच्या सुमारे 20 गाड्यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मध्य रेल्वेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 24 व 25 जानेवारी रोजी 11025 पुणे-अमरावती तसेच 23 ते 25 जानेवारीदरम्यान 11026 अमरावती-पुणे एक्सप्रेस रद्द राहणार आहे. याशिवाय 12119 अमरावती-पुणे व 12120 अजनी-पुणे एक्सप्रेस या गाड्याही 24 व 25 जानेवारीला धावणार नाहीत. अजनी-पुणे हमसफर एक्सप्रेस ये-जा दोन्ही बाजूंनी 24 व 25 जानेवारीला रद्द राहील. नागपूर-पुणे एक्सप्रेस 24 जानेवारीला, तर नागपूर-पुणे गरीब रथ 25 जानेवारीला रद्द करण्यात आली आहे.

# अनुभवाची कसोटी की बंडखोरीची लाट?

**अमरावती महापालिका निवडणूक रंगात**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - चार वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून, यंदाची लढत केवळ सत्ताबदलापुरती मर्यादित राहणार नाही, तर ती राजकीय अनुभव, पक्षनिष्ठा आणि बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर लढवली जाणार आहे. अनुभवी माजी नगरसेवकांची पुनरागमनाची तयारी आणि त्याचवेळी नव्या चेहऱ्यांची वाढती उपस्थिती यामुळे निवडणूक अधिकच रंगतदार झाली आहे.

महानगरपालिकेच्या आतापर्यंतच्या इतिहासात सातत्य राखत प्रत्येक निवडणुकीत विजय मिळवणारे मोजकेच चेहरे आहेत. त्यामध्ये विलास इंगोले यांचे नाव अग्रभागी घेतले जाते.

अनेकदा नगरसेवक व महापौर म्हणून काम पाहिलेल्या इंगोले यांचा अनुभव यंदाही काँग्रेससाठी निर्णायक ठरू शकतो. त्यांच्या जोडीला विविध पक्षांतील अनेक जुने नगरसेवक पुन्हा एकदा मतदारांच्या दारात पोहोचले आहेत.

मात्र, यंदाच्या निवडणुकीला वेगळे वळण देणारा घटक म्हणजे पक्षांतर्गत नाराजी. उमेदवारी वाटपात डावलण्यात आलेल्या अनेक माजी नगरसेवकांनी थेट बंडाचे निशाण फडकावले आहे. काहीजण अपक्ष म्हणून, तर काही पक्षविरोधात उभे ठाकल्याने भाजप आणि काँग्रेस या दोन्ही प्रमुख पक्षांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. या बंडखोरीमुळे पारंपरिक मतपेढ्या तुटण्याची दाट शक्यता असून, निवडणूक निकाल अनपेक्षित ठरू शकतात.

1992 मध्ये स्थापन झालेल्या महापालिकेने अनेक राजकीय चढउतार पाहिले आहेत. महापौरपदाचा कार्यकाळ बदलत गेला, सत्तासमीकरणे उलथापालथ झाली आणि नेतृत्वाची समीकरणे बदलली. आता 16 जानेवारी रोजी होणाऱ्या सतराव्या महापौराच्या निवडीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

एकूणच, अनुभवी नेतृत्वाची विश्वासार्हता, बंडखोरांची व्यक्तिगत ताकद आणि नव्या चेहऱ्यांचे प्रयोग या त्रिसूत्रीवर अमरावतीची महापालिका निवडणूक लढवली जाणार असून, या संघर्षातून शहराच्या राजकारणाला नवा अध्याय लाभणार, हे निश्चित आहे.

### 19 माजी नगरसेवक मैदानात

सलग विजय मिळवणारे 19 माजी नगरसेवक पुन्हा मैदानात उतरले असतानाच, पक्षांतर्गत नाराजी, बंडखोरी आणि नव्या चेहऱ्यांनी या निवडणुकीला ऐतिहासिक वळण दिले आहे. तर 8 ते 10 माजी नगरसेवक अपक्ष किंवा पक्षविरोधात मैदानात आहे. उमेदवारी नाकारल्याने दोन्ही प्रमुख पक्षांत नाराजी पहायला मिळत आहे. त्यामूळे पारंपरिक मतदार विभागांमध्ये फूट पडण्याची शक्यता आहे. तर काही अनुभवी नेत्यांनी निवडणुकीपासून अलिप्त राहणे पसंत केले आहे. या सर्व परिस्थितीत अधिकृत उमेदवारांचे विजय गणित धोक्यात आल्याचे पहायला मिळत आहे.

# या चिमण्यांनो परत फिरा रे....

**गावाबाहेरील मतदारांना साद**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.6)** - रोजगार, शिक्षण अथवा व्यवसायाच्या निमित्ताने अनेक मतदार शहराबाहेर स्थायिक झाले असून, मतदानाच्या दिवशी अमरावतीला आपल्या गावी परत येण्याची साद त्यांना घातली जात आहे. त्यांना घरी आणण्यासाठी विशेष नियोजन सुरू झाले आहे.

स्थानिक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी अद्याप कालावधी शिल्लक असल्याने सध्या बाहेरगावच्या मतदारांचा शोध घेण्यावर भर दिला जात आहे. मतदारयादीतील पत्त्यांच्या आधारे नातेवाईक, मित्रमंडळी तसेच सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून संपर्क साधला जात आहे. काही प्रभागांमध्ये तर ये-जा करण्यासाठी वाहन व्यवस्था, तिकीट, राहण्याची सोय यांसह मतदानानंतर परतीची हमी देत मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त केले जात असल्याचे चित्र आहे. माजी नगरसेवक, इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्ते मिळून प्रत्येक प्रभागातील अंतिम मतदारयादी तपासून बाहेरगावी असलेल्या मतदारांची माहिती संकलित करत आहेत. 15 जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रत्येक प्रभागातील 15 ते 20 हजार मतदारांपैकी किमान 50 टक्के मतदान गृहित धरून आकडेमोड व मायक्रोप्लॅनिंग सुरू आहे. उमेदवारांच्या कुटुंबीयांवर व विश्वासू कार्यकर्त्यांवर दररोज संपर्क साधण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. विशेषतः चुरशीच्या प्रभागांमध्ये प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार असल्याने बाहेरगावच्या मतदारांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

# एबी फॉर्मचे मिथक, माध्यमीय सनसनाटीपणा आणि निवडणूक वास्तव

महाराष्ट्र राज्यात सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विशेषतः महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुद्रित व दृकश्राव्य माध्यमांतून सातत्याने एक शब्द मोठ्या आत्मविश्वासाने वापरला जात आहे, एबी फॉर्म. वर्तमानपत्रांचे मथळे असोत की टीव्हीवरील चर्चासत्रे, एबी फॉर्मसाठी धावपळ, एबी फॉर्मची खेळी, एबी फॉर्मवरून राजकीय नाट्य अशा शब्दरचना वारंवार ऐकू येतात. मात्र हा शब्द जितक्या ठामपणे आणि ठसठशीतपणे वापरला जातो, तितकाच तो वस्तुस्थितीच्या पातळीवर चुकीचा, दिशाभूल करणारा आणि माध्यमीय अज्ञान उघड करणारा ठरतो.

-------------------

साध्या आणि स्पष्ट शब्दांत सांगायचे झाले तर एबी नावाचा कोणताही एकत्रित किंवा स्वतंत्र फॉर्म अस्तित्वातच नाही. ए आणि बी असे दोन स्वतंत्र फॉर्म असतात, तेही फक्त व फक्त १९५१ च्या लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारित येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांपुरतेच मर्यादित आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रातील महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती निवडणुकांमध्ये ए आणि बी फॉर्म लागूच होत नाहीत.

याउलट, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये Annexure-1, Annexure-2, Form II-A, Form II-B अशा वेगवेगळ्या नावांचे, पण समान उद्देश असलेले फॉर्म वापरले जातात. तरीही माध्यमे सरसकट एबी फॉर्म असा शब्दप्रयोग करून जणू काही तो एक रहस्यमय, गुप्त आणि सत्ता हस्तगत करणारे शस्त्र असल्याप्रमाणे त्याचे चित्रण करतात. हे चित्रण केवळ चुकीचे नाही, तर लोकशाही प्रक्रियेबाबत गैरसमज निर्माण करणारे आहे.

खरे तर या फॉर्म्सचा उद्देश अत्यंत तांत्रिक, स्पष्ट आणि मर्यादित स्वरूपाचा आहे. एखादा उमेदवार अमूक एका राजकीय पक्षाचा अधिकृत उमेदवार आहे की नाही, याची लेखी व कायदेशीर खात्री करून निवडणूक चिन्हाचे अचूक वाटप करणे, एवढाच त्याचा गाभा आहे. त्यापलीकडे त्यात कोणतेही गूढ, कटकारस्थान किंवा नाट्य नाही.

भारतीय निवडणूक पद्धतीत उमेदवाराची खरी ओळख त्याचे नाव नसून त्याचे निवडणूक चिन्ह असते. मतदार मत देताना नाव वाचून नाही, तर चिन्हासमोरील बटण दाबून मतदान करतो.

साक्षरतेचे प्रमाण, ग्रामीण वास्तव आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेता, चिन्ह हेच निवडणूक प्रक्रियेचे केंद्रबिंदू आहे. त्यामुळे राखीव निवडणूक चिन्हे कोणाला मिळणार, हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून तो थेट राजकीय सत्तेच्या गणिताशी जोडलेला आहे. याच ठिकाणी ए आणि बी किंवा त्यांच्या समतुल्य फॉर्म्सचे महत्त्व वाढते.

ए-प्रकारचा फॉर्म म्हणजे संबंधित राजकीय पक्षाकडून अधिकृत उमेदवारी देण्याचा अधिकार कोणत्या पदाधिकाऱ्यांना आहे, याची माहिती निवडणूक यंत्रणेला देणारा दस्तऐवज आहे. म्हणजे पक्षाचा अध्यक्ष, सचिव, अधिकृत प्रतिनिधी यापैकी कोण उमेदवारी अधिकृत ठरवू शकतो, हे स्पष्ट करणे.

बी-प्रकारचा फॉर्म म्हणजे त्या अधिकारप्राप्त पदाधिकाऱ्यांनी अमूक मतदारसंघातून अमूक अमूक उमेदवारास अधिकृत उमेदवारी दिली आहे, याचा ठोस, लेखी आणि कायदेशीर पुरावा आहे. हे फॉर्म्स फक्त नोंदणीकृत राजकीय पक्षांनाच लागू होतात, मग ते मान्यताप्राप्त असोत किंवा अमान्यताप्राप्त. अपक्ष उमेदवार, स्थानिक आघाड्या किंवा पक्षीय नोंदणी नसलेल्या संघटनांच्या उमेदवारांशी या फॉर्म्सचा कोणताही संबंध नाही.



**प्रा. डॉ. प्रशांत विघे**
**राज्यशास्त्र विषयाचे लेखक**
**भारतीय महाविद्यालय, अमरावती.**
**९३२६८७७७४९**

तरीही माध्यमीय चर्चांमध्ये जणू सर्वच उमेदवार एबी फॉर्मच्या कुबड्यांवर उभे आहेत, असा भ्रामक आभास निर्माण केला जातो.

आजच्या काळात राजकीय पक्षांचे केंद्रीकरण, नेतृत्वाची घट्ट पकड आणि अधिकृत उमेदवारी मिळवण्याची स्पर्धा प्रचंड वाढली आहे. पक्षाची उमेदवारी म्हणजे केवळ निवडणूक चिन्ह मिळणे एवढेच नव्हे, तर ती म्हणजे संसाधने, संघटना, प्रचारयंत्रणा आणि संभाव्य सत्तेची चावी.

पक्षाची उमेदवारी मिळाल्यावर उमेदवाराला पारंपरिक मतपेढ्या, स्टार प्रचारक, पक्षाची यंत्रणा आणि आयते कार्यकर्ते मिळतात. त्यामुळे ए आणि बी किंवा त्यासमकक्ष फॉर्म मिळवण्यासाठी पक्षांतर्गत संघर्ष, दबावतंत्र, लॉबिंग आणि धावपळ होत असेल, तर त्यात फारसे आश्चर्य नाही.

मात्र या प्रक्रियेचे रोमँटीकरण, नाट्यीकरण आणि सनसनाटीकरण करणे, हा माध्यमांचा लोकशाहीतील कर्तव्यभाग नाही. माहिती देण्याऐवजी अफवा पसरवणे, संज्ञांचा चुकीचा वापर करणे आणि अर्धवट ज्ञानावर आधारित स्फोटक मथळे देणे, हे माध्यमांच्या विश्वासार्हतेला तडा देणारे आहे.

भारतीय निवडणूक प्रक्रिया मुक्त, स्वतंत्र आणि पारदर्शक राहावी यासाठीच भारत निवडणूक आयोगाने १९६८ साली Election Symbols (Reservation and Allotment) Order लागू केला. त्याच धर्तीवर राज्य निवडणूक आयोगांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्वतंत्र नियमावल्या तयार केल्या.

या नियमांमधील फॉर्म्स हे लोकशाही सुरक्षित ठेवण्याचे साधन आहेत; ते सत्ता हस्तगत करण्याचे गुप्त अस्त्र नाहीत. म्हणूनच एबी फॉर्म हा शब्द वापरण्यापूर्वी माध्यमांनी किमान कायदेशीर वास्तव तपासावे, संज्ञांचा अचूक वापर करावा आणि माहिती देताना जबाबदारी व सुजाणपणा दाखवावा, ही अपेक्षा लोकशाहीत फार मोठी नाही. अन्यथा माहिती देण्याऐवजी गैरसमज पसरविण्याचे काम माध्यमेच करीत आहेत, असा निष्कर्ष काढावा लागेल.

कोणतीही गोष्ट, संज्ञा किंवा प्रक्रिया प्रसारित करताना तिचा अर्थ, तिचे महत्त्व आणि तिची मर्यादा समाजमाध्यमात काम करणाऱ्यांना समजली पाहिजे. अन्यथा त्यांच्या अज्ञानातून किंवा निष्काळजीपणातून सर्वसामान्य वाचक, मतदार आणि नागरिकांना राजकारण व निवडणूक प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने समजण्याचा धोका निर्माण होतो, हा धोका केवळ एखाद्या निवडणुकीपुरता मर्यादित नसून तो लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा ठरू शकतो.

लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती समजुतीची, माहितीची आणि विवेकाची प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेत माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच माध्यमांनी सनसनाटीपणाऐवजी सत्य, अचूकता आणि जबाबदारी यांना प्राधान्य द्यावे, हीच या लेखामागची भूमिका आहे.

# सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी

सुरेश कलमाडी या नावाशिवाय पुण्याचा राजकीय इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. जवळपास तीन दशके पुण्याच्या राजकारणावर एकहाती हुकूमत गाजवणारे पुण्याचे कारभारी असलेले पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे मंगळवार ६ जानेवारी रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या निधनाने पुण्यावर एकहाती वर्चस्व गाजवणारा नेता काळाचा पडद्याआड गेला. १ मे १९४४ रोजी जन्मलेले सुरेश कलमाडी यांनी सेंट व्हिन्सेंट हायस्कुलमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले तर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून उच्च शिक्षण पूर्ण केले.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन पायलट बनण्याचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काही वर्ष भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा केली. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात त्यांनी हवाई दलाचे पायलट म्हणून भाग घेतला होता. १९७२ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला.

संजय गांधी यांचे ते निकटवर्ती होते त्यांच्यामुळेच ते राजकारणात आले असे म्हंटले गेले. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यावर त्यांना पुण्याचे प्रमुख बनवण्यात आले. त्या काळी पुण्यात अनेक दिग्गज नेते होते मात्र सर्वांना बाजूला सारून त्यांनी पुण्याची धुरा स्वीकारली.

९० च्या दशकात तर पुण्यावर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि रेल्वे राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.

रेल्वे राज्यमंत्री म्हणून त्यांनी रेल्वेचा अर्थसंकल्पही सादर केला होता. केंद्रीय मंत्री आणि पंतप्रधान नरसिंहराव यांचे निकटवर्ती असल्याने पुण्यावर त्यांनी एकहाती वर्चस्व गाजवायला सुरुवात केली.

पुण्यात ते काँग्रेसचे सर्वेसर्वा बनले. पुणे महानगर पालिकेवर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. पुण्याचे नगरसेवक, पुण्याचा महापौर कोण होणार हे कलमाडी ठरवत असे. पुण्याचे आमदार देखील कलमाडींच्याच मर्जीतील असत. पुण्याच्या राजकारणावर त्यांची एकहाती पकड होती म्हणूनच त्यांना पुण्याचे कारभारी असे संबोधले जायचे. त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांची रीघ लागलेली असे. त्यांचे कलमाडी हाऊस कार्यकर्त्यांनी फुलून गेलेले असे.



केंद्रीय मंत्री आणि पुण्याचा खासदार या नात्याने त्यांनी पुण्याला जागतिक शहर बनवण्याचा प्रयत्न केला. पुणे मेट्रो प्रकल्प, विमानतळ विकास त्यांच्याच प्रयत्नामुळे साकार झाले. पुण्यात सर्वप्रकारच्या पायाभूत सुविधा असाव्यात असा त्यांचा आग्रह असे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आणि पुणे फेस्टिवल सुरू करून त्यांनी पुण्याला जागतिक स्तरावर नेले. १९९१ ते १९९६ या काळात पुणे काँग्रेसचे सर्वेसर्वा असणाऱ्या कलमाडी यांनी १९९७ साली मात्र काँग्रेस सोडली. १९९८ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पराभवानंतर कलमाडी यांनी शरद पवारांमुळेच आपल्याला पराभव स्वीकारावा लागला असे त्यावेळी जाहीर वक्तव्य केले होते.

अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहिलेल्या कलमाडी यांना भाजपने पाठिंबा दिला होता आणि त्यांच्या प्रचारासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी पुण्यात आले होते. १९९८ साली झालेली राज्यसभा निवडणूक खूप गाजली या निवडणुकीत ते पुन्हा अपक्ष म्हणून उभे राहिले.

या निवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धा होते राम कदम. राम कदम हे गांधी कुटुंबाच्या जवळचे होते शिवाय जिंकून येण्याइतपत मते त्यांच्याकडे होते तरीही त्यांना धोबीपछाड देऊन कलमाडी यांनी ती निवडणूक जिंकली आणि राजकारणात भूकंप घडवला होता. या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी अशा घोषणा दिल्य होत्या. १९९९ साली काँग्रेस फुटली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली सुरेश कलमाडी पुन्हा काँग्रेसमध्ये परतले.

२०१० पासून मात्र त्यांच्या राजकीय कारकीर्दीला उतरती कळा लागली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. त्यांना काहीकाळ तुरुंगातही रहावे लागले. २०२५ साली ईडी ने त्यांच्या विरोधात पुरावे नसल्याने क्लोजर रिपोर्ट दाखल केला न्यायालयानेही तो स्वीकारला पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

सुरेश कलमाडी हे राजकीय विजनवासात पोहचले होते. जवळपास तीन दशके पुण्याचे कारभारी राहिलेले सबसे बडे खिलाडी सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

■ ■ ■

# चीनचा रडीचा डाव

वर्ष २०२० मध्ये लडाखमधील चीनच्या सीमेवरील गलवान खोऱ्यात भारत आणि चीन यांच्या सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षावर आधारित बॅटल ऑफ गलवान हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला.

गलवान खोऱ्यातील संघर्ष दोन्ही देशाच्या संबंधांच्या इतिहासातील महत्त्वाचा बिंदू ठरला. भारतीय सैनिकांनी चिनी सैनिकांशी प्रत्यक्ष दोन हात करून जे शौर्य दाखवले त्याची इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंद झाली.

भारतासाठी गलवान संघर्ष शौर्य, बलिदान आणि राष्ट्रीय स्वाभिमानाचा विषय आहे तर चीनसाठी ही घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर नकोशी असलेली, स्वतःच्या प्रतिमेचा चक्काचूर करणारी आहे म्हणूनच या चित्रपटाला चीन विरोध करत आहे. या संघर्षात चीनचा दारुण पराभव झाला होता. भारताने चीनला त्याची जागा दाखवून त्याची मस्ती उतरवली होती. या चित्रपटातून ते जगासमोर आल्याने चित्रपटात संघषार्ची खरी परिस्थिती पालटून दाखवली असून त्यात भारताच्या बाजूने दृष्टिकोन सादर करण्यात आला आहे. हा प्रचारात्मक चित्रपट आहे आणि म्हणूनच याला विरोध आहे असे चीनचे म्हणणे आहे. देशांतर्गत प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणत्याही परकीय देशांना नाही. हा अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारा आहे.

भारताने त्याला तात्काळ आणि सडेतोड प्रत्युत्तर दिले. भारत चीनची किंवा अन्य कोणत्याही देशाची दादागिरी आता खपवून घेणार नाही असे स्पष्ट संदेश आज दिले जात आहे. अशी कणखर भूमिका पाच-सहा दशकापूर्वी घेतली असती तर आजचे चित्र वेगळे असते . चीनला स्वतःच्या सैनिकांचा पराभव स्वीकारण्याचे धैर्य नाही त्यामुळे तो चिडचिड करत आहे पण त्यासाठी इतर देशांनी सत्य दडपावे अशी अपेक्षा करणे हा पराकोटीचा अहंकार आहे.

चीनच्या असुरी विस्तारवादी मानसिकतेमुळे त्याचे अनेक देशांशी वाद आहे. भारतासह सर्व चीन बाधित देशांना एकत्र येऊन चीनला कृतिशील विरोध करण्याचे धोरण आखले पाहिजे. गलवान संघर्ष हा इतिहासाचा भाग आहे आणि इतिहास ना दबावाने पुसला जातो, ना धमक्यांनी पालटता येतो. विरोध, आक्षेप आणि दबाव यामुळे इतिहासाची दिशा पालटत नाही. चीनचे भारतातील कुठल्याही प्रांतावर दावा करण्याचे धाडस होणार नाही असा वाचक सरकारने निर्माण करणे आवश्यक आहे.

------------------

**लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

■ ■ ■

# साहित्य, आर्थिक साक्षरता आणि स्त्री सक्षमीकरणाचा सुंदर मिलाफ

शिक्षण, उद्योग आणि साहित्य यांचा अनोखा संगम असणाऱ्या शोभा मोरे या महाराष्ट्र राज्यासाठी अभिमानाचा विषय आहेत.

प्राथमिक शिक्षक असलेले वामनराव काकडे आणि व्यावसायिक सुभद्रा काकडे यांच्या शिस्तबद्ध, संस्कारमय आणि शैक्षणिक संपन्नतेने नटलेल्या कुटुंबात शोभा मोरे यांचा जन्म झाला. कुटुंबाकडून मिळालेली शिक्षणाची बीजे त्यांच्या मनात रुजली. आपल्या पायावर उभे राहत असतानाच स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करावे, या आईच्या शिकवणुकीत त्यांना पती श्रीकांत मोरे आणि सासरे सदाशिव मोरे यांची भक्कम साथ लाभली.

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये कार्यरत असताना लोकांमध्ये आर्थिक गुंतवणुकीची शिस्त, बचत गटांच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण आणि साहित्य संमेलनांच्या माध्यमातून दुर्लक्षित गुणवंत कवी व साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांच्याकडून घडत आहे.

शिक्षणाधिकारी असलेले शोभा यांचे सासरे सदाशिव रामचंद्र मोरे यांनी त्यांच्या कार्यकाळात सर्वसामान्यांना कर्ज मिळवताना येणाऱ्या अडचणी जवळून अनुभवल्या. त्यामुळे सामान्यांना सुलभ व्याजदरात कर्ज मिळावे आणि कर्जासाठी होणारी धडपड कमी व्हावी, या हेतूने त्यांनी स्वतःची बँक स्थापन करण्याचा निर्णय घेतला. पती श्रीकांत मोरे हे सहकार खात्यात असल्याने त्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करून मनोरमा सहकारी बँकेची स्थापना केली.

त्यांची सासू मनोरमा मोरे यांच्या नावाने ९ मे १९९७ रोजी सुरू झालेल्या मनोरमा सहकारी बँकेचा प्रवास अखंड सुरू असून, शोभा मोरे या सेवानिवृत्तीनंतर मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन आहेत.

या प्रवासात नैतिक अधिष्ठान जपत जनसामान्यांना व दुर्बल घटकांना कमी परताव्यात कर्ज कसे देता येईल, यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. काटकसर, बचतीचे महत्त्व आणि बचत गटांच्या माध्यमातून शेकडो लोक या बँकेशी जोडले गेले असून आज या बँकेचा व्यवसाय १००० कोटींपर्यंत पोहोचला आहे.

सासरे शिक्षणाधिकारी असल्यामुळे त्यांना मनापासून वाटत होते की अर्थकारणातून लक्ष्मीची पूजा तर होतेच, पण त्याला सरस्वतीच्या अधिष्ठानाची जोड देणेही आवश्यक आहे. याच विचारातून शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये दडलेल्या साहित्यिक सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी २००२ साली सोलापूर येथे शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे पहिले साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले.

या संमेलनाला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला आणि सातशे ते आठशे साहित्यप्रेमींनी उपस्थिती दर्शवली. जिल्हा व राज्य पातळीवरील तज्ज्ञ साहित्यिक या संमेलनात सहभागी झाले होते. या उपक्रमाची दखल महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखेने घेतली आणि त्यातून महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) ची स्थापना झाली. मनोरमा साहित्य मंडळाचा प्रवास अखंड सुरू असून आतापर्यंत ११ साहित्य संमेलने यशस्वीरीत्या संपन्न झाली आहेत.



दर दोन वर्षांनी साहित्य संमेलने आयोजित केली जातात आणि दरवर्षी साहित्यिकांना पुरस्कार प्रदान केले जातात. या संमेलनांतून कवी संमेलने, मराठीचा जागर, चर्चासत्रे आणि मार्गदर्शक मुलाखती घेतल्या जातात.




mahasagarngp@gmail.com

या संमेलनांचा परीघ विस्तारत असून केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर कर्नाटक, गोवा व गुजरात येथूनही तज्ज्ञ साहित्यिक सहभागी होत आहेत.

प्रत्येक साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्ष म्हणून हे अवघड कार्य लीलया पेलणाऱ्या शोभा मोरे अभिमानाने सांगतात की, आतापर्यंत ज्या साहित्यिकांना संमेलनाध्यक्ष म्हणून बोलावण्यात आले, ते पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक रामदास फुटाणे आणि नागपूरचे डॉ. रविंद्र शोभणे यांचा त्या विशेष उल्लेख करतात.

या साहित्यिक प्रवासात सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू इरेश स्वामी, कवी माधव पवार, कर्नाटक येथील रत्नाजी आगवणे, कोल्हापूरचे प्रा. चंद्रकुमार नलगे आणि नांदेडचे श्रीकांत देशमुख अशा अनेक ज्येष्ठ साहित्यिकांना मनोरमा साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

साहित्य संमेलनांच्या माध्यमातून नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देतानाच शोभा मोरे यांनी सर्वसामान्यांसाठी आर्थिक साक्षरता आणि बचत गटांद्वारे स्त्री सक्षमीकरणाची धुरा समर्थपणे सांभाळली. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये कार्यरत असताना त्यांनी दैनंदिन अनुभवातून सामान्य नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. आर्थिक गुंतवणूक करताना घ्यावयाची काळजी, ठेवींना नामनिर्देशन (नॉमिनेशन) असणे, तसेच आर्थिक व्यवहार करताना आवश्यक दक्षता याबाबत त्या मार्गदर्शन करत.

कोरोना काळात त्यांनी माझे कुटुंब, माझी जबाबदारी, माझी बँक हा आर्थिक साक्षरतेचा उपक्रम राबविला. यासोबतच त्या महिला बचत गटांचे संचालन करतात. या माध्यमातून महिलांचा आर्थिक, बौद्धिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्या तीन नर्सऱ्या असून त्या बचत गटांना चालवण्यासाठी दिल्या आहेत. गायी खरेदी, मिरची कांडप, मंगल कार्यालय यांसारख्या सामूहिक व्यवसायांसाठी कर्जपुरवठा केला जातो. शेतात खुरपणी किंवा खत घालण्याच्या कामांसाठी बचत गटांचे सहकार्य घेऊन महिलांना उत्पन्न मिळवून दिले जाते.

हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांमधून महिलांच्या आरोग्य विषयक मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ डॉक्टरांना आमंत्रित केले जाते, तसेच आर्थिक साक्षरतेचे धडे दिले जातात. यावर्षी सायबर सिक्युरिटीविषयी महिलांना मार्गदर्शन करण्यात येणार असून यासाठी मनोरमा फाउंडेशनमार्फत निधी उपलब्ध करून दिला जातो. या सेवाभावी कार्यात डॉक्टर असलेला मुलगा, मुलगी व जावई निशुल्क आरोग्यसेवा देऊन सक्रिय सहभाग घेतात.

साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहणारे आणि सहकार क्षेत्रातून निवृत्त झालेले श्रीकांत मोरे साहित्य संमेलनाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. त्यांचे भक्कम पाठबळ असल्याचे शोभा मोरे सांगतात. मोरे दाम्पत्यांच्या आयोजन व नियोजनात त्यांच्या सहकाऱ्यांचा मोठा वाटा असून, त्यामुळेच मनोरमा साहित्य पुरस्कार देशभरात प्रसिद्ध झाले आहेत, असे त्या अभिमानाने नमूद करतात.

माझे भाऊ सांगली येथे जिल्हाधिकारी आहेत. वडिलांचे स्वप्न होते की आम्ही भावंडांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवावे, आणि ते आज प्रत्यक्षात उतरते आहे, असे त्या सांगतात.

सर्वांगीण विकासासाठी आर्थिक साक्षरता हा महत्त्वाचा पैलू असून शैक्षणिक व बौद्धिक विकासाबरोबरच जनसामान्यांनी आर्थिक गुंतवणुकीचे ज्ञान वाढविणे आवश्यक आहे, असा मोलाचा संदेश त्या लेखातून देतात.

नैतिक व मौलिक मूल्यांचे अधिष्ठान जपत ती मूल्ये समाजात रुजवणाऱ्या शोभा मोरे यांची ही वाटचाल यशाच्या अजून उंच शिखरापर्यंत पोहोचो, यासाठी आमच्या शुभेच्छा.

-------------------

**संपर्क : शोभा मोरे - ९८९०५१४२१३**

■ ■ ■

## नवीन वर्ष : आत्मनिरीक्षण ते आत्मसुधारणा

**वाचक लिहितात**

नवीन वर्ष म्हणजे केवळ कॅलेंडरवरील तारीख बदलणे नाही, तर स्वतःकडे आणि समाजाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन स्वीकारण्याची संधी आहे. प्रत्येक नवीन वर्ष आपल्या हातात एक कोरा कागद देते- त्यावर काय लिहायचे, हे आपण ठरवायचे असते.गेल्या वर्षातील यश-अपयश, आनंद-दुःख हे सारे अनुभव आपल्याला शिकवून गेले आहेत. त्यांच्याकडे मागे वळून पाहताना खंत नाही, तर शहाणपण आणि आत्मविश्वास मिळायला हवा. कारण अपयश हे थांबवण्यासाठी नसून, पुढे जाण्यासाठी दिशा देणारे असते.

आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक आणि कधी कधी अस्वस्थ करणाऱ्या वातावरणात, नवीन वर्ष आपल्याला थांबून विचार करण्याची गरज सांगते- आपण अधिक संवेदनशील होऊ शकतो का? एकमेकांना समजून घेऊ शकतो का? स्वतःबरोबरच समाजासाठीही काही चांगले करू शकतो का? नवीन वर्षाचा खरा संकल्प म्हणजे केवळ वैयक्तिक प्रगती नव्हे, तर माणुसकी, प्रामाणिकपणा आणि सकारात्मकतेचा प्रसार करणे हा असायला हवा.

लहानसे चांगले पाऊलसुद्धा अनेकांच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकते. बदल शक्य आहे, या विश्वासावरच नव्या वर्षाची सुरुवात करूया. आपल्या विचारांमध्ये स्पष्टता, कृतीत सातत्य आणि मनात आशा ठेवली, तर हे वर्ष निश्चितच स्वतःसाठी आणि समाजासाठीही अर्थपूर्ण ठरेल.नवीन वर्ष सर्वांसाठी प्रेरणादायी, शांततामय आणि आशादायी ठरो, हीच सदिच्छा.

■ **प्रा. विजय कोष्टी**
**कवठे महांकाळ, जि. सांगली.**

## मकरसंक्रांतीचे शास्त्र

सर्वजण दरवर्षीच मकरसंक्रांतीचा सण साजरा करतात. परंतू सण साजरा करण्यामागील शास्त्र समजले तर तो सण साजरा करताना आपल्याला अधिक आनंद मिळतो. मकरसंक्रांतीचा सण हा मुली व महिला यांच्या आवडीचा रथसप्तमीपर्यंत साजरा केला जाणारा सण आहे. या सणाला मकरसंक्रांत का म्हणतात? तर ज्या काही बारा राशी आहेत त्यापैकी मकर ही एक रास आहे.सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करण्याच्या प्रक्रीयेला संक्रांत म्हणतात.मकरसंक्रांतीदिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो म्हणून या दिवसाला मकरसंक्रांती म्हणतात. या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरु होते.

■ **संगिता भोसले.**

# हिवाळा सुरू होताच वजन झपाट्यानं वाढलंय का?



थंडीचे हवामान येताच अनेक लोकांना असे वाटते की त्यांचे वजन हळूहळू वाढू लागते, तर आहारात किंवा दिनचर्यामध्ये कोणताही मोठा बदल होत नाही. उबदार कपडे, कमी सूर्यप्रकाश आणि निस्तेज वातावरण यामुळे शरीराच्या कार्यावर परिणाम होतो.

या ऋतूत भूक वाढणे, जास्त विश्रांती घेणे आणि कमी शारीरिक हालचाली होणे सामान्य आहे. परंतु प्रत्येक वेळी वजन वाढण्याचे कारण केवळ खाणे-पिणे किंवा व्यायामाचा अभाव नाही . खरं तर, हिवाळ्यात शरीरात काही बदल होतात, ज्याचा वजनावर परिणाम होऊ शकतो. ह्यामध्ये संप्रेरकांचे संतुलन महत्त्वाची भूमिका बजावते. हिवाळ्यात, शरीर स्वतः ला उबदार ठेवण्याचा आणि ऊर्जा वाचविण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत, काही हार्मोन्सची क्रिया बदलू शकते.

तुमच्या शरीरातील हे हार्मोन्स भूक, उजेर्चा वापर आणि चरबी संचय नियंत्रित करतात. जेव्हा त्यांचा तोल बिघडतो तेव्हा वजन वाढू लागते. अशा परिस्थितीत, हे समजून घेणे महत्वाचे आहे की केवळ सवयीच वजन वाढण्यास जबाबदार नसतात, तर शरीराच्या आत सुरू असलेल्या हार्मोनल प्रक्रियेस देखील जबाबदार असतात.

हिवाळ्यात वजन वाढण्यात प्रामुख्याने तीन हार्मोन्स महत्त्वाची भूमिका बजावतात . प्रथम लेप्टिन आहे, जो भूक नियंत्रित करतो. थंडीत त्याचा प्रभाव कमकुवत होऊ शकतो, ज्यामुळे पोट भरले असतानाही खाण्याची इच्छा कायम राहते.

दुसरा म्हणजे घरेलिन, जो भूक वाढविणारा संप्रेरक आहे. हिवाळ्यात त्याची पातळी वाढल्यास वारंवार उपासमार होऊ शकते. तिसरा म्हणजे कोर्टिसोल, जो तणावाशी संबंधित संप्रेरक आहे. थंड, कमी सूर्यप्रकाश आणि दिनचर्यातील बदलांमुळे कोर्टिसोल वाढू शकतो, ज्यामुळे शरीरात जास्त चरबी साठवली जाते. या तीन हार्मोन्सचे एकत्रितपणे असंतुलन वजन वाढण्यास कारणीभूत ठरते. हार्मोन्स संतुलित ठेवण्यासाठी प्रथम नियमित दिनचर्या अवलंबणे महत्वाचे आहे. वेळेवर झोपणे आणि पुरेशी झोप घेणे हार्मोनल फायदेशीर आहे. संतुलित आहार घ्या, ज्यामध्ये प्रथिने, फायबर आणि निरोगी चरबी असतात. हलका व्यायाम किंवा दररोज चालल्याने चयापचय चांगले होते. तणाव कमी ठेवण्यासाठी ध्यान किंवा दीर्घ श्वासोच्छ्वासाची सवय लावा.

हिवाळ्यात वजन वाढणे ही अनेकांना जाणवणारी सामान्य समस्या आहे आणि यामागे विविध कारणे असतात. या ऋतूमध्ये थंडीमुळे शरीराला उष्णता टिकवून ठेवण्यासाठी जास्त ऊर्जा लागते, त्यामुळे भूक अधिक लागते आणि अन्नाचे प्रमाण वाढते. हिवाळ्यात आपण उष्ण, तुपकट, गोड पदार्थ जास्त खातो, जसे की गुळ, शेंगदाणे, तीळ, फराळाचे पदार्थ, जे कॅलरीने समृद्ध असतात. तसेच थंडीमुळे बाहेर फिरणे, व्यायाम करणे कमी होते आणि शारीरिक हालचाल घटते.

कमी सूर्यप्रकाशामुळे व्हिटॅमिन डीची पातळी कमी होते, ज्याचा परिणाम मेटाबॉलिझमवर होतो. याशिवाय जाड कपड्यांमुळे वजन वाढलेले लगेच लक्षात येत नाही, त्यामुळे खाण्यावर नियंत्रण राहत नाही. या सर्व कारणांमुळे हिवाळ्यात वजन वाढण्याची शक्यता जास्त असते.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### पत्रकार दिन - आव्हाने

रक्षकाच्या वेषात भक्षकांनी
साधूच्या वेषात सैतानांनी
बसवलय देशात बस्तान
होईल कसा भारत महान ?

फाडूनी यांचे बुरखे तू
उजागर कर कारस्थान
लोकशाहीचा आधारस्तंभ तू
याचे असु दे मनी भान ..!

चौकीदार तू देशाचा
सतर्क रहा सर्वकाळ
तरच उज्वल राहील
भारताचा भविष्यकाळ .!

रक्तविहीन क्रांतीसाठी
लेखणी तुज्या हाती
'आदर्श भारत ' म्हणून
जगी पसरू दे कीर्ती ..!

# ग्रॅज्युइटी हडपल्याच्या आरोप करत कामगाराचे उपोषण

## रतन इंडियाविरोधात कामगारांचा लढा तीव्र



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– रतन इंडिया ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापनाने कामगारांची कायदेशीर ग्रॅज्युइटी हडप केल्याचा गंभीर आरोप करत सोमवारी सकाळपासून प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर शेकडो कामगारांनी उपोषण सुरू केले आहे. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनात, न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहणार असल्याचा ठाम इशारा देण्यात आला आहे.

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाशी संलग्न दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी (डीएमएफ) कंपनीतील कामगारांनी 13 नोव्हेंबर 2017 ते 30 एप्रिल 2025 या कालावधीत सलग सात वर्षे सहा महिने सेवा बजावली आहे. मात्र, ग्रॅज्युइटी कायद्यानुसार उपदान देणे बंधनकारक असतानाही डीएमएफ कंपनीचे कामकाज संपुष्टात येऊन सात ते आठ महिने उलटून गेले तरी एकाही कामगाराला ग्रॅज्युइटी देण्यात आलेली नाही. हा कायद्याचा उघड भंग असल्याचा आरोप विवेक गुल्हाने यांनी केला.

या संदर्भात कामगारांनी वारंवार प्रशासनाकडे निवेदने सादर केली. तथापि, कोणतीही ठोस दखल न घेतल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. आंदोलन दडपण्यासाठी रतन इंडिया व्यवस्थापनाकडून कामगारांना धमकावण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला. रविवारी रात्री उपोषणस्थळी उभारलेला मंडप हटविण्याचा प्रयत्न झाल्याचेही सांगण्यात आले. मात्र, कोणत्याही दबावाला न झुकता कामगार आपल्या हक्कांसाठी ठाम असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### कपातीची रक्कम हडपली ?

याशिवाय मार्च 2021 च्या वेतनातून प्रत्येकी 1200 ते 1300 रुपये कपात करण्यात आलेली रक्कम अद्याप परत करण्यात आलेली नाही. ही कामगारांच्या घामाच्या पैशांची लूट असून, सर्व थकबाकी त्वरित अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे. दुपारी वैद्यकीय पथकाने उपोषणकर्त्यांची तपासणी केली. मात्र सायंकाळपर्यंत ना प्रशासनाने, ना रतन इंडिया व्यवस्थापनाने ठोस भूमिका घेतल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. न्याय मिळेपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार कामगारांनी केला आहे.

# पाण्यासाठी वाट पाहणारे वरुड शहर!

## कर पूर्ण, पण पाणीपुरवठ्याला ना दिवस, ना वेळ – सुशील बेले





**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.6 )** – शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता केवळ कागदोपत्री, आकडे किंवा तांत्रिक कारणांपुरता मर्यादित राहिलेला नसून तो नागरिकांच्या दैनंदिन जगण्याशी जोडलेली गंभीर समस्या बनला आहे. नगरपरिषद नागरिकांकडून वर्षभराचे 365 दिवसांचे पाणीपट्टी कर नियमितपणे वसूल करत असताना, प्रत्यक्षात मात्र 4 ते 5 दिवसांनीच पाणीपुरवठा केला जातो. तोही कोणतेही ठराविक दिवस किंवा निश्चित वेळापत्रक नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

पाणी नेमके कधी येणार सकाळी की रात्री, आज की उद्या याची कोणतीही स्पष्ट माहिती नसल्यामुळे महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना तसेच नोकरी–व्यवसायासाठी बाहेर जाणाऱ्या नागरिकांना दिवसभर पाण्याच्या प्रतीक्षेत राहावे लागत आहे. नियोजनशून्य पाणीपुरवठा म्हणजे नागरिकांच्या वेळेची, सन्मानाची आणि मूलभूत हक्कांची पायमल्ली असल्याची भावना शहरात तीव्र होत आहे.

या प्रश्नावर जनशक्ती संघटनेचे सुशील बेले यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. पाणी हे कोणाचे उपकार नसून तो जगण्याचा मूलभूत हक्क आहे. नगर पालिकेकडून कर पूर्ण घेतला जात असेल, तर सेवा देखील पूर्ण मिळायलाच हवी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

### प्रशासनाकडून कृतीची अपेक्षा

आता वरुड शहरातील नागरिक नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांकडे अपेक्षेने पाहत आहेत. पाणीपुरवठ्याचे ठराविक दिवस व वेळापत्रक जाहीर होणार का, तसेच प्रत्यक्ष पुरवठ्याच्या दिवसांप्रमाणे कर आकारण्याचा निर्णय घेतला जाणार का, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कर भरूनही अनिश्चिततेत जगावे लागणे ही लोकशाहीची वेदना असून, आता शहराला शब्दांपेक्षा ठोस निर्णय आणि तातडीच्या कृतीचीच अपेक्षा आहे.

# जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा, सांस्कृतिक महोत्सव उद्यापासून

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – शालेय जीवनात विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्य व कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अमरावती यांच्या वतीने जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महाकुंभ दिनांक 8 ते 10 जानेवारी 2026 दरम्यान श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील सुमारे तीन हजार विद्यार्थी विविध क्रीडा व सांस्कृतिक प्रकारांमध्ये सहभाग घेणार आहेत. महोत्सवाचे उद्घाटन गुरुवार, दि. 8 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र राहणार आहेत. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, शिक्षण उपसंचालक निलिमा टाके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवाच्या तयारीसंदर्भात 6 जानेवारी रोजी जिल्हा परिषद माध्यमिक मुलींच्या शाळेत नियोजन सभा घेण्यात आली. शिक्षणाधिकारी सतीश मुगल व क्रीडा संयोजक प्रवीण खांडेकर यांनी समितीनिहाय आढावा घेत महोत्सव यशस्वी व दर्जेदार करण्याबाबत मार्गदर्शन केले. या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षण विभागातील अधिकारी, क्रीडा संयोजक तसेच प्रसिध्दी समितीने केले आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – पत्रकार दिनानिमित्त मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आद्य पत्रकार 'दर्पणकार'आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी 'दर्पण' हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू करून मराठी पत्रकारितेचा पाया रचला. त्यामुळे 6 जानेवारी हा दिवस 'पत्रकार दिन' किंवा 'दर्पण दिन' म्हणून साजरा केला जातो. यावेळी माहिती अधिकारी अपर्णा यावलकर, वरिष्ठ लिपीक मनोज थोरात, योगेश गावंडे, लिपीक कोमल भगत सहायक छायाचित्रकार सागर राणे, वाहन चालक स्वप्नील महल्ले, संदेश वाहक राजश्री चौरपगार, प्रतिक वानखडे आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# प्रगतिशील शेतकऱ्यांसाठी कृषी पुरस्कारांची घोषणा

## 31 जानेवारीपर्यंत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– कृषी विभागामार्फत सन 2025 साठी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतिशील शेतकरी, संस्था व गटांकडून विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी आपले प्रस्ताव येत्या 31 जानेवारी 2026 पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार (3 लाख रुपये), वसंतराव नाईक कृषीभूषण, जिजामाता कृषीभूषण, कृषीभूषण सेंद्रीय (2 लाख रुपये), वसंतराव नाईक शेतीमित्र (1.20 लाख रुपये), उद्यान पंडित (1 लाख रुपये), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ (सर्वसाधारण व आदिवासी गट – 44 हजार रुपये) तसेच युवा शेतकरी पुरस्कार (वयोमर्यादा 40 वर्षे, 1.20 लाख रुपये) यांचा समावेश आहे. सर्व पुरस्कारांमध्ये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र दिले जाणार आहेत. शेती, फळबाग, कृषी संलग्न क्षेत्र व संघटनात्मक कार्यात उल्लेखनीय योगदान देणारे पात्र ठरणार असून अर्जदाराच्या नावावर शेती असणे, शेती हा मुख्य व्यवसाय असणे आवश्यक आहे. अद्ययावत 7/12, 8–अ, चारित्र्य पडताळणीचा दाखला व आवश्यक कागदपत्रांसह तीन प्रतींत प्रस्ताव सादर करावा. सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर व तालुका कृषी अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज – जिल्हाधिकारी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – जिल्ह्यातील विविध समस्या ओळखून त्यावर प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. जिल्हा वॉर रूमच्या माध्यमातून प्राधान्य क्षेत्रे निश्चित करून विकासकामांना गती दिली जात असून, पर्यटनासह इतर क्षेत्रांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा वॉर रूमच्या बैठकीत चिखलदरा परिसरातील पर्यटन सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. वनविभागाच्या विविध उपक्रमांमुळे पर्यटकांची संख्या वाढत असून, ॲडव्हेंचर पार्कमुळे साहसी पर्यटनाला चालना मिळाली आहे. त्यामुळे चिखलदराला केंद्रबिंदू मानून पर्यटन विकासासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश देण्यात आले. चिखलदरा विकासासाठी आयसीआयसीआय फाउंडेशनने पुढाकार घ्यावा व आवश्यक आराखडा तयार करावा, तसेच पर्यटन विभागाची 'आई' योजना येथे प्रभावीपणे राबवावी, असेही सांगण्यात आले. गाविलगड किल्ला परिसरात रस्ते व दिशादर्शक फलक उभारण्याची जबाबदारी पुरातत्त्व विभागाने घ्यावी. आमझरी गाव 'मधाचे गाव' म्हणून विकसित करताना युवकांना मधपालनाचे प्रशिक्षण द्यावे. मेळघाटातील 22 गावांतील वीज प्रश्न, पीएम मित्रा पार्कमधील वीज केंद्र, आयटी पार्क, सिट्रस इस्टेट, कोल्ड स्टोरेजचा लाभ, इतवारा उड्डाणपूल व रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठासाठी जमीन संपादनाबाबत संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

# शेतकरी उत्पादक कंपन्या व बचतगटांना संधी

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत आर्थिक सहाय्यासाठी आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा–2 अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील कृषी व्यवसायांना मोठी चालना मिळणार आहे. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी जिल्ह्यातील 454 गावांची निवड करण्यात आली असून, मूल्यसाखळी आधारित उपक्रम व पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना हवामानस्नेही शेतीकडे वळवणे आणि शाश्वत उपजीविकेची साधने निर्माण करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

या प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला स्वयंसहाय्यता गट, प्रभाग संघ व ग्रामसभांना विविध उपक्रमांसाठी 60 टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. शेतीतील मजूर टंचाई लक्षात घेता, महिला बचत गटांमार्फत 'गावस्तरीय कृषी अवजारे बँक' स्थापन करण्यासाठी 24 लाख रुपयांपर्यंतचे अनुदान उपलब्ध आहे. तसेच गोदामे, शीतगृहे, डाळ मिल, तेल गाळप, फळ प्रक्रिया व निंबोळी अर्क युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या 60 टक्क्यांपर्यंत, कमाल 60 लाख रुपयांचे बँक–एंडेड अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे किमान 250 सभासद असणे व वार्षिक उलाढाल प्रकल्प रकमेच्या 5 टक्के असणे आवश्यक आहे. 20 लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रकल्पांसाठी बँक कर्ज मंजुरी बंधनकारक आहे. इच्छुक संस्थांनी अधिकृत डीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# पोलीस-पत्रकार समन्वयातूनच समाजात विश्वास व सुव्यवस्था – पीएसआय लिंगोट

## चांदूर रेल्वेत अ.भा.ग्रा. पत्रकार संघातर्फे पत्रकार दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.6 )** – पोलीस आणि पत्रकार हे समाजहितासाठी कार्य करणारे दोन महत्त्वाचे घटक असून, समाजात सत्य, सुरक्षा आणि विश्वास प्रस्थापित करणे हा दोघांचाही समान उद्देश आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांवर असते, तर घडामोडींचे वास्तव चित्र समाजासमोर मांडण्याचे कार्य पत्रकार करतात. त्यामुळे या दोन्ही यंत्रणांमध्ये परस्पर विश्वास, संवाद आणि सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. पोलीस व पत्रकार यांच्यातील समन्वयातूनच समाजात विश्वास आणि सुव्यवस्था कायम राहू शकते, असे प्रतिपादन चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नंदलाल लिंगोट यांनी केले.

ते अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने चांदूर रेल्वे येथे आयोजित पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान होते. प्रमुख अतिथी म्हणून पीएसआय नंदलाल लिंगोट, जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर भगोले, तालुकाध्यक्ष विवेक राऊत, नवनिर्वाचित नगरसेवक हर्षल वाघ, नगरसेवक व पत्रकार सुमेद सरदार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक राऊत यांनी केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. चांदूर रेल्वे शहरात पत्रकार भवन उभारण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन नगरसेवक हर्षल वाघ व सुमेद सरदार यांनी दिले. कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राजीव शिवणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवी कलाने यांनी मानले.

# राजकारणांचे माहेरघर चुरणी तहसील केव्हा होणार ?

## तहसीलचा मुद्दा केवळ आश्वासनांपुरताच




**मारोती पाटणकर**

**चुरणी,( दि.6 )** – मेळघाटातील राजकारणांचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या चुरणीला तहसीलचा दर्जा केव्हा मिळणार, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत राजकीय हालचालींची नाळ चुरणीशी जोडलेली असतानाही प्रशासनिक दर्जाबाबत मात्र आजही निराशाच पदरी पडत आहे. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद अशा प्रत्येक निवडणुकीत चुरणी केंद्रस्थानी असते. मात्र निवडणूक संपताच तहसीलचा मुद्दा केवळ आश्वासनांपुरताच मर्यादित राहतो, अशी खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

चुरणी परिसरातून अनेक दिग्गज राजकारणी घडले आहेत. विविध पक्षांचे तालुका अध्यक्ष, पदाधिकारी व प्रभावी कार्यकर्त्यांचे हे केंद्र मानले जाते. निवडणुकीच्या काळात नेत्यांची येथे गर्दी होते, आश्वासनांची बरसात होते; मात्र प्रत्यक्ष विकासाच्या मुद्द्यांवर, विशेषत: तहसील निर्मितीवर, ठोस निर्णय होताना दिसत नाही. त्यामुळे राजकारणासाठी चुरणी महत्त्वाची, पण प्रशासनासाठी दुय्यम का? असा सवाल उपस्थित होत आहे.

तहसील नसल्यामुळे चुरणी व आजूबाजूच्या गावांतील नागरिकांना दैनंदिन कामकाजासाठी दूरच्या तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्रे, सातबारा फेरफार, निवडणूक ओळखपत्र, वृद्धापकाळ पेन्शन, शेतकरी योजनांचे अर्ज यासाठी वारंवार हेलपाटे पडतात. आदिवासीबहुल भाग असल्याने आर्थिक व सामाजिक अडचणी अधिक तीव्रतेने जाणवतात. पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था, वाढलेला वाहतूक खर्च आणि वेळेची नासाडी ही मोठी समस्या आहे. स्थानिकांच्या मते, भौगोलिक, लोकसंख्या व प्रशासकीय सर्व निकष चुरणी पूर्ण करते. शासकीय इमारतींसाठी जागा, दळणवळणाची उपलब्धता, परिसरातील गावांची संख्या लक्षात घेता चुरणी तहसील झाल्यास प्रशासन अधिक गतिमान होईल. शिक्षण, आरोग्य, कृषी व महसूल विभागांचे समन्वयित कामकाज सुलभ होईल, तसेच नागरिकांचा वेळ व खर्च वाचेल. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर चुरणीचा आवाज पुन्हा बुलंद होत आहे. आश्वासनांवर नव्हे, तर निर्णयांवर विश्वास हवा, अशी ठाम भूमिका घेत चुरणीकरांनी तहसील मंजुरीची ठोस तारीख जाहीर करण्याची मागणी केली आहे. आता प्रश्न इतकाच—राजकीय वजन असलेल्या चुरणीला तहसीलचा दर्जा केव्हा मिळणार, की हा प्रश्न पुढील निवडणुकीपर्यंत पुन्हा प्रलंबितच राहणार ?

> निवडणुकीत आमचा उपयोग होतो; मात्र नंतर आमचा प्रश्न विसरला जातो, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, सर्वपक्षीय सहमतीचा अभाव व ठोस पाठपुराव्याअभावी हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. मेळघाटातील आदिवासी जनतेचा केवळ मतांसाठी वापर होत आहे.
>
> **नरेंद्र टाले,**
> **तालुकाध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष.**

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळा येथे सांस्कृतिक कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.6 )** – शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली.


या वेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, लोकनृत्य, समूहगीत, एकांकिका, नृत्यनाट्य तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांतून उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणांतून सामाजिक संदेश, भारतीय संस्कृतीचे वैभव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख होते. त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख अतिथी म्हणून वामनराव भडके, वामनराव बिडकर, अशोकराव कविटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिक्षकवृंदाच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षक व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक




# छातीत का जाणवतात वेदना?



थंडीत शरीराला उष्णता मिळावी या हेतूने गरम पेयं प्यायली जातात. व्यायामामुळेही शरीरात उष्णता निर्माण होते. पण थंडी असल्याचं कारण देत या काळात बरेच जण व्यायाम टाळतात. बोचरी थंडी असताना सकाळी उठण्याचा कंटाळा येणं हे यामागचं एक कारण असतं. शिवाय या दिवसात व्यायाम करताना छातीत अचानक वेदना जाणवू शकतात. अशा वेदनांमुळेही व्यायाम टाळला जातो. पण तसं न करता वेदनांमागचं कारण जाणून घ्यायला हवं. वेदना फक्त थंडीतच जाणवतात का, भविष्यात याचे काही दुष्परिणाम होऊ शकतात का या प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ या.

हिवाळ्यात घराबाहेर पडल्यानंतर थंड वाऱ्यामुळे नाकाला झोंबल्यासारखं वाटतं. श्वास घेतल्यानंतर जडत्त्व येऊन नाक लाल झाल्यामुळे हा परिणाम दिसतो. असं असलं तरी केवळ थंडीमुळे नाकात वेदना जाणवत नाहीत. नाकाने श्वास घेतल्यानंतर हवा फुफ्फुसात जाईपर्यंत थंड हवेचं रूपांतर उष्ण हवेत करण्यासाठी शरीराला पुरेसा वेळ मिळालेला असतो. पण तुम्ही धावता किंवा व्यायाम करता तेव्हा श्वास घेण्याच्या पद्धतीत थोडा बदल होतो. नाकावाटे थंड हवा आत घेतली जाते. पण ती थेट फुफ्फुसात जाते. त्यामुळे धावायला सुरूवात केल्यानंतर लगेचच तीव्र स्वरूपाच्या वेदना जाणवतात. या वेदना म्हणजे शरीराने थंड हवेला दिलेला प्रतिसाद असतो. वेदनांमुळे शरीराला कोणताही धोका निर्माण होत नाही. यासाठी औषधोपचार किंवा डॉक्टरांच्या

**व्याधी विकार**

सल्ल्याची गरजही नसते. मात्र यामुळे अस्थमा रूग्ण तसंच फुफ्फुसाचे विकार असणाऱ्यांना थोडा त्रास जाणवू शकतो. थंडीत व्यायाम करताना घाम येतो. सहाजिकच शरीरातील पाण्याची पातळी कमी होते. हे लक्षात घेता थंडीतही पुरेशा प्रमाणात पाणी प्यायला हवं. या काळात श्वासावाटे शरीरात गेलेल्या हवेत आर्द्रता नसल्यामुळे पेशींना ओलाव्याची गरज असते. पाण्याचा रूपाने पुरेसा ओलावा मिळायला हवा.

# शूजमुळेही होते पाठदुखी

लोक आरामदायी चालण्यासाठी शूज घालतात; मात्र कधी कधी याचा उलटा परिणाम होतो आणि शूजमुळे पायांना, कंबरेला वेदना होऊ शकतात. यासोबतच सूज येणे किंवा चालण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. हे नवीन किंवा जुन्या शूजमुळे घडू शकते. त्यामुळे शूजची गुणवत्ता तपासणे आणि जुन्या शूजची कालबाह्यता ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शूजमुळे पाठदुखी होऊ शकते. ते शूजच्या आरामाच्या स्तरावर अवलंबून असते, कारण शूज शरीराला आधार देतात. पाय योग्य स्थितीत नसतील तर याचा परिणाम पाठीवर होऊ शकतो. दुर्लक्ष केल्यास ही वेदना गुडघे किंवा कमरेपर्यंत पसरू शकते.



**आपण कुठे चुकतो?**

**डॉ. प्रसन्न नेने**

**जुने शूज बदलण्याची चार मुख्य चिन्हे**

✲ **तळव्याचा झीज :** शूजच्या तळव्याची पकड कमी झाली किंवा तो निसरडा झाला असेल, तर शूज जीर्ण झाले आहेत. यामुळे योग्य आधार आणि ग्रिप मिळत नाही. त्यामुळे अस्वस्थता वाढते.

✲ **तळवा कडक होणे :** चांगले शूज असूनही पाय दुखत असतील तर तळव्याची गुणवत्ता कमी असू शकते. कडक तळव्यामुळे आराम मिळत नाही. अशावेळी मऊ कुशनिंग असलेले शूज निवडा.

✲ **कुशनिंगची झीज :** कालांतराने शूजचे कुशनिंग कमी होते, तळवा आत बुडतो आणि दाब वाढून वेदना होतात.

✲ **चुकीचा आकार :** शूज आणि तळवा चांगला असूनही पाठदुखी होत असेल तर आकार योग्य नसावा. पायांना परफेक्ट फिटिंग असलेले शूज निवडणे आवश्यक आहे.

**शूज कधी बदलावेत?**

शूजची स्थिती चांगली असली तरी त्यांना दुर्गंध येत असेल तर ते जीर्ण झाल्याचे लक्षण आहे आणि बदलणे गरजेचे आहे. तळवे तुटणे किंवा बुरशी येणे हीही चिन्हे आहेत.

दुर्गंध येताच शूज बदलणे उत्तम. तज्ज्ञांच्या मते, रनिंग शूज ३००-५०० मैलनंतर बदलावेत. कारण जुने शूज पाठदुखी आणि इतर समस्या वाढवू शकतात. योग्य शूज निवडून आरोग्याच्या अनेक समस्या टाळू शकता.

# आला हिवाळा सांधेदुखी सांभाळा

हिवाळ्यात महिलांच्या शरीरात होणारे संप्रेरक (हार्मोनल) बदल, पोषण कमतरता, स्वप्रतिकार शक्तीचा त्रास (ऑटोइम्यून विकार), वयोमानाप्रमाणे स्नायू, हाडे, अस्थिबंध यांच्यातील त्रासदायक बदल, सूर्यप्रकाशाची कमतरता, दिवसभर घरातील काम यामुळे महिलांमध्ये सांधेदुखीचा त्रास डोके वर काढत आहे.

महिला खासकरून गृहिणी घरातीलच कामे करतात. त्यामुळे सूर्यप्रकाशाशी संपर्क न आल्याने जीवनसत्त्व 'ड' (व्हिटॅमिन डी) कम तरता जाणवते. या जीवनसत्त्वाअभावी हाडांचे दुखणे वाढते. त्याचबरोबर कमी पाणी पिणे, कॅफिनचे अतिरिक्त सेवन, वजन वाढ, व्यायामाचा अभाव यामुळे सांध्यातील कडकपणा व कोरडेपणा वाढतो. त्याने वेदनेची तीव्रता वाढते. त्याचबरोबर या काळात थायरॉइड ग्रंथी पुरेसे हार्मोन्स तयार न करणाऱ्या हायपोथायरॉइडीझम चयापचय क्रिया मंदावते. सोबत थकवा, वजन वाढणे, नैराश्य यांसारखी लक्षणे दिसतात.

**ऋतुविकार**

**डॉ. मेघा दळे**

स्वप्रतिकार शक्तीचा सांध्यावर होणारा हल्ला (ह्मॅटॉइड आर्थायटिस) व सोरायटिक आर्थायटिस या आजारांचे प्रमाण बळावते. पोषण कमतरता यामध्ये अधिक भर घालते. यामध्ये विटामिन बी -१२ च्या कमतरतेमुळे नसांच्या वेदना, हातपायांना मुंग्या येणे, सुन्न पडणे ही लक्षणे दिसतात; तर रक्तातील लोहाच्या कमतरतेमुळे जडपणा वाटणे व वेदना वाढतात. विषाणूजन्य आजारांच्या पश्चात हे त्रास हिवाळ्यात वाढतात. चाळिशीच्या आसपास, स्नायूंची घनता कमी होऊन सांध्यांवर ताण येतो आणि रजोनिवृत्तीनंतर इस्ट्रोजेन हार्मोनचे प्रमाण व हाडांमधील कॅल्शिअम कमी झाल्याने हाडांचे नुकसान अधिक वाढते.

**सांधेदुखीचे निदान करणाऱ्या विविध तपासण्या**



✲ डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे व्हिटॅमिन 'डी-३' आणि 'बी-१२', तसेच थायरॉइड फंक्शन' (टीएसएच, टी श्री, टी फोर) चाचण्या कराव्यात.

✲ त्यातून पोषणात्मक किंवा हार्मोन असंतुलन ओळखायला मदत होते

✲ शरीरातील दाह, सूज याचे निदान करण्यासाठी (इन्फ्लेमेटरी मार्कर्स) 'ईएसआर', 'सीआरपी' या चाचण्या आहेत.

✲'ह्मॅटॉइड फॅक्टर' आणि 'अँटी सीसीपी अँटीबॉडीज' तपासून 'ऑटोइम्यून आर्थायटिस'चे निदान करता येते.

✲ युरिक ॲसिडच्या तपासणीतून गाऊट या संधिवाताचा एक प्रकाराचे संकेत दिले जातात

✲'डेक्सा स्कॅन'द्वारे हाडांच्या घनतेची तपासणी करत अस्थिजन्य हाडांचा धोका ओळखता येतो.

**उपाय**

सांध्यांमध्ये लालसरपणा, सूज किंवा गरमपणा जाणवत असल्यास, काही आठवडे सांध्यांमध्ये कडकपणा जाणवत असल्यास, तीव्र वेदना, पुरळ येणे, आराम किंवा घरगुती उपाय करूनही सतत दुखणे या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. स्नायूंना हळूहळू ताण देऊन लवचिक करावे, योगा, चालणे, फिजिओथेरपी, दहा मिनिटे कोवळ्या सूर्यप्रकाशात थांबा आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्हिटॅमिन 'डी', 'बी-१२' आणि लोह घेणे उपयुक्त ठरेल. पोषक तत्त्वांनी युक्त आहार घ्या आणि प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ कमी करा. वजन नियंत्रित ठेवा, जेणेकरून सांध्यांवर ताण कमी होईल आणि दीर्घकालीन हानी टाळता येईल.

# अशी आहे एनएस१ चाचणी

अँटीबॉडीज आणि एनएस १ या दोन चाचण्यांनी डेंग्यूचं निदान केलं जातं. यापैकी सर्वात प्रभावी आणि अचूक निदान करणारी चाचणी कोणती हे जाणून घ्यायचं असेल तर या दोहोंमधला फरक समजून घ्यायला हवा. एनएस १ ही इम्युनोग्लोबिन अँटीजेन चाचणी आहे. अँटीजेन म्हणजे अँटीबॉडीज निर्माण करण्यासाठी शरीराला उत्तेजित करणारा पदार्थ. नवा अँटीजेन शरीरात शिरल्यानंतर रोगप्रतिकारक यंत्रणा त्याबद्दल जाणून घेते आणि त्याचे गुणधर्म अंगिकारून भविष्यातल्या हल्ल्याच्या दृष्टीने स्वत:ला तयार करते. त्यामुळे डेंग्यूचं अचूक निदान करण्याच्या दृष्टीने ही चाचणी योग्य ठरते. दुसरीकडे डेंग्यूच्या विषाणूंना प्रतिसाद म्हणून अँटीबॉडीजचा होणारा विकास जाणून घेण्यासाठी अँटीबॉडी चाचणी करण्याचा सल्ला दिला जातो. पण संसर्ग झाल्यानंतर साधारण पाचव्या दिवशी अँटीबॉडिजच्या निर्मितीला सुरूवात होते. त्यामुळे या चाचणीतून योग्य निदान होण्याची शाश्वती देता येत नाही. म्हणूनच एनएस १ ही सर्व दृष्टीने योग्य चाचणी आहे. एनएस १ पहिल्या दिवसापासूनच छोट्यातल्या छोट्या जंतूंचं निदान करू शकते.




**आरोग्यवेध**

अँटीबॉडी चाचण्या संसर्ग झाल्यानंतर पाच दिवसांनी केल्या जात असल्या तरी एनएस १ बद्दल तसं होत नाही. ही चाचणी पहिल्या दिवशीही करता येते आणि अचूक परिणाम दाखवते. तीव्र स्वरूपाचा ताप येत असेल तर पहिल्याच दिवशी एनएस १ चाचणी करून डेंग्यूचं निदान होऊ शकतं. आयजीएमसारख्या अँटीबॉडींचं निदान संसर्गानंतर पाच ते दहा दिवसांनी होतं. पण एनएस१ या अँटीजेनचं निदान पहिल्या दिवशीही होऊ शकतं.

# मीठ कमी खाऊनही रक्तदाब का वाढतो?

जेवणात मीठ कमी खाऊनही रक्तदाब अनियंत्रित राहतो. खरे कारण लोक जे मीठ अन्नात घालतात, ते नाही, तर दररोजच्या वेगवेगळ्या फास्ट फूडमधील ते मीठ आहे.भारतात उच्च रक्तदाबाचे एक प्रमुख कारण बनत आहे. ही चिंता आता फक्त अनुमान राहिलेली नाही. भारतातील तीनपैकी एक व्यक्ती उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहे. अनेक शहरांमध्ये ही संख्या ३५ टक्क्यांहून अधिक आहे. सर्वात चिंताजनक गोष्ट म्हणजे मोठ्या संख्येने रुग्ण ५० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत आणि त्यांना त्यांच्या स्थितीची माहिती नाही किंवा ते औषधे घेत असले, तरीही त्यांना योग्य उपचार मिळत नाहीत.

**मीठ धोकादायक का आहे?**

मीठातील सोडियम शरीरात पाणी टिकवून ठेवते. यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये दाब वाढतो. त्यामुळे हृदयाला जास्त काम करावे लागते. या मीठाच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने रक्तवाहिन्यांना नुकसान होते आणि हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, हृदयविकार आणि मूत्रपिंडाच्या आजाराचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. खरी समस्या अशी आहे, की भरपूर मीठ खारटपणाची चवही देत नाही. दिसायला सुरक्षित, आतून धोकादायक रोज ब्रेड किंवा पाव खाणे लोक सुरक्षित मानतात; पण ब्रेड शरीरात भरपूर सोडियम वाढवू शकते. बरेच लोक तपकिरी किंवा मल्टीग्रेन ब्रेडला आरोग्यदायी मानतात; परंतु यामध्ये अनेकदा पांढऱ्या ब्रेडइतकेच मीठ असते. सॉस आणि चटण्यांमध्येही मीठ लपलेले असते. टोमॅटो केचप, सोया सॉस, चिली सॉस, सँडविच स्प्रेड आणि पॅकेज केलेल्या चटण्यांमध्ये त्यांची चव आणि शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी भरपूर मीठ असते. दिवसभर कमी प्रमाणात हे खाल्ल्याने सोडियमचे प्रमाण जास्त होऊ शकते. याव्यतिरिक्त, चिप्स, भुजिया, खारट मिक्स, क्रॅकर्स आणि अगदी बेक्ड किंवा हलके खारट स्नॅक्समध्येही भरपूर मीठ असते. हे खारट वाटत नाही, म्हणून लोक सोडियमचे प्रमाण लक्षात न घेता जास्त खातात.




**आहारात दुप्पट मीठ**

चीज स्लाईसची देखील काळजी घ्या. चीज स्लाईस, चीज स्प्रेड्स आणि फ्लेवर्ड बटरमध्येही मीठ जास्त असते. दररोज यापैकी कमी प्रमाणात खाऊनही एकूण मीठाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. तयार पदार्थांमध्ये चव आणि पोत यासाठी भरपूर मीठ वापरले जाते. एका सामान्य भारतीय जेवणात रोटी, बाजारातील मसाल्यांनी बनवलेला भाजीपाला पदार्थ, लोणचे, पापड आणि चटणी यांचा समावेश होतो. मीठ न घालताही, सोडियमची पातळी सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असते. म्हणूनच, २०२५ मध्येही, उच्च रक्तदाबाच्या जवळजवळ अर्ध्या रुग्णांचा रक्तदाब औषधोपचार असूनही नियंत्रित राहणार नाही. आरोग्यासाठी दररोज एक चमचापेक्षा कमी मीठ सेवन केले पाहिजे; परंतु अंदाजानुसार बहुतेक भारतीय पॅकेज्ड आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांमुळे, नकळत दुप्पट मीठ वापरत आहेत.


**जाणून घ्या**

**डॉ. कुंदन गायकवाड**

**जोखीम कशी कमी करायची?**

अन्न पॅकेजवरील सोडियम लेबल्स वाचणे, सॉस आणि स्प्रेड्स कमी करणे, पॅकेज्ड स्नॅक्सपेक्षा ताजे आणि घरी शिजवलेले जेवण जास्त खाणे हे सर्व रक्तदाब नियंत्रित करण्यात खूप मदत करू शकतात. हळूहळू मीठ कमी केल्याने चवीमध्येही बदल करता येतो.

# मुतखडा आहे?



अनेकांना मूतखड्याची समस्या भेडसावते. हा अत्यंत वेदनादायी विकार आहे. लक्षणं, कारणं आणि रंग यावरून आयुर्वेदाने मूतखड्याची चार प्रकारांमध्ये विभागणी केली आहे. वाताशमारी, पित्ताशमारी, कफाशमारी आणि शुक्राशामरी असे हे चार प्रकार आहेत. वात, कप आणि पित्त या प्रवृत्तींवर आयुर्वेदाचा भर असतो. वाताचं असंतुलन कफ वाळण्यास कारणीभूत ठरतं आणि मूतखडा विकसित होतो, असं आयुर्वेद सांगतं.


आयुर्वेदानुसार योग्य आहार, प्रतिबंधात्मक उपाय आणि भरपूर पाणी पिणं या उपायांनी छोट्या आकाराचे खडे पडून जातात. वाळूच्या कणापेक्षा मोठ्या आकाराचे खडे आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि औषधांनी नष्ट होऊ शकतात. पण त्यापेक्षा मोठ्या आकाराचे खडे काढून टाकण्यासाठी फ्लश थेरपी किंवा शस्त्रक्रिया करून घ्यावी लागते.

**विकार आणि आयुर्वेद**

लिंबूपाणी, ताक, नारळ पाणी, भोपळ्याचं सूप आणि प्रमाणात मोसंबीचा रस पिऊन छोट्या आकाराचा मूतखडा बरा होऊ शकतो. दिवसातून दोन वेळा अनोशा पोटी वेलची घातलेला ऊसाचा रस पिणं, ऊस आणि दुधासोबत तुळशीच्या बिया, मधासोबत जिरं खाणं, कलिंगडाचं सेवन, आहारातून आवळा पूड घेणं अशा उपायांनी या विकाराला आळा घालता येतो. वेळेत जेवणं, उठल्यावर गरम पाणी पिणं, टोमॅटो, वांगं, चिकू,दुग्धजन्य पदार्थ, मैद्याचे पदार्थ न खाणं या नियमांचं पालन करायला हवं.

# धुरामुळे फुफ्फुसाची क्षमता कमी

धुराचे प्रमाण वाढत असताना, रुग्णांच्या श्वसनाच्या समस्या आणखी वाढल्या आहेत. रुग्णांच्या फुफ्फुसांची क्षमता अर्ध्यापर्यंत कमी झाली आहे आणि त्यांचा खोकला आठवडे नाही, तर महिनो न महिने कमी होत नाही. जागे झाल्यावर श्वास लागणे, छातीत जडपणा, थकवा आणि सतत खोकला येणे यासारख्या समस्या सामान्य झाल्या आहेत. अशा रुग्णांना वारंवार रुग्णालयात जावे लागत आहे.



हवा इतकी धोकादायक आणि विषारी होत आहे, की श्वसन आणि फुफ्फुसांच्या समस्या असलेल्या रुग्णांची संख्या वाढत आहे. हिवाळ्यात प्रदूषणामुळे रुग्णांची संख्या दुप्पट झाली आहे. वाढत्या रुग्णांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. खोकला ही सर्वात सामान्य समस्या आहे. महिलांना सकाळी श्वास घेण्यास त्रास होत आहे. वर्षाच्या उर्वरित काळात खोकला लवकर बरा होतो; परंतु हिवाळा सुरू होताच कोरडा खोकला आणि थकवा वाढू लागतो.

**व्याधी विचार**

**डॉ. महेश दळे**

**खराब हवेमुळे फुफ्फुसांचे नुकसान होते का?**

भारतात आयएलडी (इंटरस्टिशियल लंग डिसीज) रुग्णांची वाढती संख्या इतर देशांपेक्षा जास्त आहे. ती खराब हवेच्या गुणवत्तेमुळे असू शकते. तथापि, सध्या प्रदूषण हे 'आयएलडी'चे कारण आहे की नाही हे सांगणे कठीण आहे, कारण ठोस डेटा अद्याप उपलब्ध नाही.

**काय काळजी घ्याल?**

धुराच्या संपर्कात येण्याचे प्रमाण कमी करावे. कारण प्रदूषण हे फुफ्फुसांच्या नुकसानाचे एकमेव कारण नसले, तरी ते समस्या वाढवू शकते. जर एखाद्याला त्याचा सामना करावा लागला, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

# हिवाळ्यात वाढते पाठदुखीची समस्या



हिवाळा सुरू झाला आहे. राज्यात थंडीचे प्रमाण वाढत चालले आहे. वाढत्या थंडीसोबत इतर अनेक आजार डोके वर काढतात. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी बरेचजण पाय गुडघ्यांमध्ये दुमडून झोपतात, यामुळे पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक रचनेवर ताण येतो. त्याचबरोबर एकाच जागी बसून तासनतास काम करणे, मोबाईल-लॅपटॉपचा अतिवापर आणि व्यायामाचा अभाव यामुळे चुकीची शारीरिक स्थिती (पोश्चर) ही मोठी समस्या बनली आहे. यामुळे पाठीचे दुखणे, मानेचे दुखणे आणि कंबरेचे दुखणे यांसारख्या तक्रारी वाढतात. थंड हवामानात शरीरातील स्नायू आकुंचन पावतात आणि रक्तप्रवाह कमी होतो. त्यामुळे स्नायूंमध्ये कडकपणा येतो आणि लवचिकता कमी होते. हिवाळ्यात अनेक जण व्यायाम करणे टाळतात, घराबाहेर पडणे टाळतात आणि दीर्घकाळ बसून राहतात. या सवयींमुळे पाठीचे दुखणे, मान आणि खांद्यांमध्ये वेदना होतात. सांधेदुखी आणि श्वसनाच्या समस्यांव्यतिरिक्त, हिवाळ्यात पाठदुखी हा आणखी एक सामान्यपणे आढळून येणारी समस्या आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिवाळ्यात पाठदुखीची समस्या सर्वच वयोगटात आढळून येते. थंड तापमानामुळे स्नायूंना कडकपणा येतो आणि हालचाल मंदावल्याने अस्वस्थता वाढते. पुरेशी जागरूकता आणि जीवनशैलीतील बदलांसह हिवाळ्याशी संबंधित पाठदुखी टाळता येते आणि ती प्रभावीपणे व्यवस्थापित केली जाऊ शकते.

**आरोग्यमंत्र**

**डॉ. दिलीप सिरसाठ**

**स्नायुंवर ताण येण्याची शक्यता अधिक**

तापमान कमी झाल्यामुळे पाठीच्या कण्याला आधार देणारे स्नायू घट्ट होतात. त्यामुळे लवचिकता कमी होते आणि स्नायुंवर ताण येण्याची शक्यता अधिक असते.

# उभं राहून काम करताय?

बैठी जीवनशैली आरोग्यासाठी धोकादायक असल्याने अनेक कार्यालयांमध्ये स्टँडिंग डेस्कचा पर्याय स्वीकारण्यात येत आहे. स्टँडिंग डेस्क म्हणजे उभं राहून काम करणं. यामुळे बसून काम करण्याने उद्‌भवणारे धोके कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पण प्रत्यक्षात उभं राहून काम केल्यामुळे कोणतेही लाभ होत नसल्याचंही समोर आलं आहे. कॅलिफोर्नियातले प्राध्यापक डॉ. डेव्हिड रेम्पेल यांनी याबाबत संशोधन केलं. अशाप्रकारे उभं राहून काम करण्याला कोणताही शास्त्रीय आधार नाही असं त्यांचं म्हणणं आहे. उभं राहिल्याने आपली शारीरिक हालचाल होत असल्याचं लोकांना वाटतं. पण प्रत्यक्षात ते चुकीचं आहे.

एका जागेवर ८ ते ९ तास बसून आणि त्यातही एकाच स्थितीत राहून काम केल्याने पाठीतल्या चकत्यांवरचा ताण वाढून त्या फुगीर बनतात. त्यामुळे उभं राहून काम करण्याचा पर्याय देण्यात आला. पण पूर्ण दिवस एकाच स्थितीत उभं राहणं पाठीचा कणा आणि पाठ दोहोंसाठीही चांगलं नसतं. अचानक शरीराची स्थिती बदलणं

**हे टाळा**

धोकादायक ठरू शकतं. उभं राहण्याच्या स्थितीतही शरीराची फारशी हालचाल होत नाही. जर्नल ऑफ एपिडेमिओलॉजीत छापून आलेल्या संशोधनानुसार उभं राहून काम करणाऱ्यांमध्ये हृदयाशी संबंधित विकारांचा, गुंतागुंतींचा धोका जास्त असतो. म्हणूनच शरीराचा ताठरपणा कमी करण्यासाठी थोड्या हालचालीची आवश्यकता असते हे सतत उभं राहून



काम करणाऱ्यांनी समजून घ्यायला हवं. पूर्ण वेळ एकाच स्थितीत उभं राहण्यापेक्षा फोनवर बोलताना किंवा अधूनमधून थोडं चालायला हवं. डेंग्यू हा एक घातक विकार आहे. दरवर्षी डेंग्यूरुग्णांमध्ये वाढ नोंदवली जाणं हे धोक्याचं लक्षण आहे. भारतात या रोगाचं प्रमाण बरंच जास्त आहे. डेंग्यूची प्राथमिक लक्षणं फ्लूसारखी असली तरी प्रसंगी ती प्राणघातक ठरत असल्याने रूग्णाला रूग्णालयात दाखल करावं लागू शकतं. तीव्र स्वरूपाचा ताप, अंगदुखी, पुरळ उठणं, डोळ्यांच्या मागच्या भागात वेदना जाणवणं, भूक मंदावणं, उलट्या, मळमळ अशा एकसारख्या लक्षणांमुळे डेंग्यू आणि फ्लूमधला फरक ओळखणं खूप कठीण होऊन बसतं. ही लक्षणं दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहिली तर काही चाचण्यांनी या विकाराचं निदान होऊ शकतं.

# मोफत बसपासून करमाफी अन् चोवीस तास पाणी

## नागपूरकरांसाठी काँग्रेसचा जाहीरनामा



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
नागपूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मंगळवारी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करत शहराच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी आणि जनहितकारी आराखडा मांडला. स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर हे एकमेव ध्येय ठेवत काँग्रेसने २० सूत्रांचा सर्वसमावेशक कार्यक्रम जाहीर केला असून, नागपूरकरांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित १७ हून अधिक महत्त्वाच्या योजना यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

गेल्या १९ वर्षांत भाजपच्या नेतृत्वाखालील नागपूर महापालिकेच्या कारभारामुळे मूलभूत नागरी सुविधांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असल्याचा ठपका काँग्रेसने या जाहीरनाम्यात ठेवला आहे. वाढते कर, अपुरा पाणीपुरवठा, खड्डेमय रस्ते, वाहतूक कोंडी, पूरस्थिती आणि आरोग्यविषयक समस्या यामुळे नागपूरकर त्रस्त झाले असल्याचे नमूद करत, या सर्व प्रश्नांवर ठोस उपाय सुचवणारा आराखडा पक्षाने सादर केला आहे.

जाहीरनाम्यातील प्रमुख घोषणांमध्ये ५०० चौरस फूटांपर्यंतच्या घरांना संपूर्ण मालमत्ता करमाफी, २४ बाय ७ अखंड पाणीपुरवठा आणि महिन्याला ३० हजार लिटरपर्यंत मोफत पाणी, तसेच आपली बस सेवेमध्ये महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्यसैनिक व माजी सैनिकांसाठी मोफत प्रवास यांचा समावेश आहे. प्रत्येक घरातून दिवसातून दोन वेळा कचरा संकलन, शहरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करणे आणि पूर व पाणी साचण्याच्या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

झोपडपट्टीधारकांना मोफत मालकी हक्काचे पट्टे, एनएमसी, एनआयटी व नझूल लीजवरील प्लॉट्सना फ्रीहोल्ड, तसेच आरक्षण जमिनीवरील अनधिकृत प्लॉट्सना आर.एल. मंजुरी देण्याची घोषणा करत काँग्रेसने घरकुल व मालकी हक्काच्या प्रश्नांवर भर दिला आहे.

अपंग, बीपीएल कुटुंबे आणि पदवीधर युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या मोफत योजना, तसेच युवकांसाठी तात्पुरत्या रोजगाराच्या संधी देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

शहराच्या पायाभूत सुविधांबाबत स्मार्ट ट्रॅफिक सिग्नलिंग, हायटेक स्ट्रीटलाईट्स, नवीन उड्डाणपूल, रेल्वे ओव्हरब्रिज व अंडरब्रिज उभारणीची योजना मांडण्यात आली आहे. भांडेवाडी डम्पिंग यार्डचे कायमस्वरूपी स्थलांतर, सांडपाणी व्यवस्थेचे पूर्ण निराकरण आणि डासमुक्त शहराची उभारणी यावरही भर देण्यात आला आहे.

याशिवाय १५१ इंग्रजी माध्यमांच्या शाळा, १५१ उद्याने, १५१ क्रीडांगणे, १५१ फेरीवाला व खाऊ गल्ल्या, ई-लायब्ररी, समाजभवने, योगा शेड्स आणि ग्रीन जिम्स उभारण्याच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. नाग, पिवळी व पोहरा नद्यांसह तलावांचे सौंदर्यीकरण, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि वारसा वृक्षांचे संवर्धन यांचाही जाहीरनाम्यात समावेश आहे.

काँग्रेसने मिशन १०० काँग्रेस नगरसेवक या आधी जाहीर केलेल्या अभियानाचा पुनरुच्चार करत, नागपूरच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांचा विश्वास आणि आशीर्वाद मागितला आहे. नागपूरकरांच्या हितासाठी सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते एकजुटीने काम करतील, असा विश्वास व्यक्त करत काँग्रेसने महापालिका निवडणुकीत आक्रमक तयारीचे संकेत दिले आहेत.

पत्रपरिषदेतला काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,, विजय वडेट्टीवार, रंजित कांबळे, आमदार विकास ठाकरे, आमदार अभिजीत वंजारी, कुणाल चौधरी, प्रवक्ता अतुल लोंढे, माजी मंत्री अनीस अहमद, माजी आमदार अशोक धवड, दिनेश बानाबाकोडे, तसेच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## मी केलेल्या विकासाचा भुतकाळ
# वर्तमानात कामाला येत आहे!

### माजी नगरसेवक व भाजप उमेदवार स्वाती अमोल निस्ताने दांडगा विश्वास

■ **रोहित गासे, अमरावती, दि. ६ :**
सन २०१२ ते २०१७ या पंचवार्षिकमध्ये मी नगरसेविका असताना प्रभागात केलेला विकास अजुनही माज्या मतदारांच्या स्मरणात आहे आणि तोच भुतकाळातील विकास आज वर्तमानातील निवडणूकीत माझ्या कामाला येत असल्याचा दांडगा विश्वास माजी नगरसेवक तथा संत गाडगे बाबा(पीडीएमसी) प्रभाग क्र. २ मधून लढत देत असलेल्या भाजपच्या उमेदवार स्वाती अमोल निस्ताने यांनी व्यक्त केला. त्या दैनिक महासागरला दिलेल्या एका विशेष मुलाखती दरम्यान बोलत होत्या.



स्वाती अमोल निस्ताने

विशेष मुलाखत

**तुम्ही यंदाच्या निवडणूकीत कोणता मुद्दा घेवून जनतेच्या समक्ष जात आहेत?**

■ माझे पती स्व. अमोल निस्ताने यांच्याकडून मला समाजकारणाचा वारसा मिळाला. जनतेचे माझ्यावर विश्वास ठेवून सन २०१२ मध्ये मला नगरसेवक बनविले. त्यानंतर तब्बल १८ कोटींची कामे आम्ही या प्रभागात केली. जनतेला मुलभूत सुविधा उपलब्ध करवून दिल्या. हक्काचा नगरसेवक म्हणून जनतेने मला प्रेम दिलं. त्यामूळे इतर मुद्दे घेवून जनतेपुढे जाण्याची गरज मला नाही. माज्या रुपाने जनतेला विकासाची शाश्वती असल्याचा ठाम विश्वास मला आहे.

**जनतेसाठी भविष्यात कोणत्या योजना तुमच्या विकासाच्या ब्ल्यु प्रिंटमध्ये आहे?**

■ भौगोलिकदृष्ट्या संत गाडगे बाबा(पीडीएमसी) प्रभाग क्र. २ हा मोठा प्रभाग आहे. त्यामूळे विकास कामे करण्यासाठीची मोठी संधी या प्रभागामध्ये आहे. प्रचारासाठी फिरत असताना मला अनेक ठिकाणी नागरिकांनी त्यांच्या समस्यांचा पाढा वाचून दाखविला. या चार वर्षाच्या प्रशासक राजमध्ये प्रचंड हालअपेष्टा नागरिकांना सहन कराव्या लागल्या.

तुटलेल्या नाल्यांची दुरुस्ती, त्यानंतर असलेल्या तुंबलेल्या नाल्यांची स्वच्छता, कचःयाचे ढीगारे, पाणी पुरवठ्याच्या समस्या, दिवाबत्तीच्या समस्या, नादुरुस्त रस्त्यांचा समस्या मोठ्याप्रमाणात निर्माण झाल्या आहेत, शहराच्या नविन भागात अजुनही रस्ते आणि नाल्या नाहीत. सर्वात आधी या विकास कामांना मार्गी लावणे हे माझ्या विकासाच्या ब्ल्यु प्रिंटमध्ये आहे.

**एक महिला म्हणून महिलांसाठीच्या तुमच्या काय योजना राहतील?**

■ महिलांच्या हाताला घरबसल्या रोजगार देण्यासाठी विशेष प्रयत्न राहील. निदान २०० रुपये रोजाचा रोजगार घरी बसून महिलांना कसा प्राप्त करवून देता येईल याची संकल्पना आम्ही तयार करित आहो. याकरिता एमआयडीसींमधील कारखान्यांशी महापालिकेने टायप करावे अशी मागणी आपण सभागृहात राहील.

आणि विधवा, परितक्त्या, गरजवंत महिलांच्या हाताला घरबसल्या कसा रोजगार देता येईल याचा प्रयत्न आम्ही करु. महिलांच्या आरोग्याविषयी बारमाही विशेष उपक्रम कसे राबविता येईल, ज्यामध्ये महिलांची आरोग्य तपासणी, रोग निदान व विनामुल्य उपचार महापालिकेच्या तज्ञ डॉक्टरांकडून कसे देता येईल याचेही आमचे प्रयत्न राहतील.

**शिक्षणाच्या बाबतीत महापालिका प्रशासनात काय सुधारणा गरजेच्या आहेत?**

■ महापालिकेच्या शाळांमध्ये शहरात अद्यावत क्लासरुमची निर्मिती भाजपच्या सत्तेत झाल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. हाच धागा पकडत त्या पुढे म्हणाल्या, आता इतर शाळांप्रमाणे विनामुल्य ग्लोबल शिक्षण या विद्यार्थ्यांना कसे देता येईल? विविध स्पर्धा परिक्षांबाबतची आवड विद्यार्थ्यांमध्ये कशी रुजवता येईल? याकरिता आम्ही प्रयत्नशील राहू, असे सांगत स्कील डेवलपमेंटमध्ये धडे या शाळांमधून गिरवले गेले पाहिजे असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलून दाखवला. एकूणच त्यांचा प्रभाग आणि अमरावती शहराच्या विकासाबाबत त्यांची तळमळ दिसून आली.

# आणखी एका पीडिताची ओळख पटली

■ **महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. ६ :**
मूत्रपिंड विक्री प्रकरणात बंगळुरू येथील आणखी एका पीडिताची ओळख पटली आहे. ही व्यक्ती या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. पोलिसांना पाहून तो पसार झाला होता. त्याला चंद्रपूर पोलीस मुख्यालयात तत्काळ हजर रहावे, अशा आशयाची नोटीस बजावण्यात आली.

मूत्रपिंड विक्री प्रकरण

पोलिसांचे एक पथक पीडिताला ताब्यात घेण्यासाठी बंगळुरू येथे गेले होते. मात्र, पोलीस अटक करणार, या भीतीने तो पळाला. येत्या दोन ते तीन दिवसात हा व्यक्ती पोलिसांसमोर स्वतःहून हजर होणार असल्याची माहिती आहे. या व्यक्तीचे मूत्रपिंडदेखील त्रिची येथील क्रिम्स रुग्णालयात काढण्यात आले होते.

याप्रकरणी उत्तर प्रदेश येथून ताब्यात घेतलेल्या पीडिताचा व्यवसाय होता. वडिलांना व्यवसायात अपयश आल्याने त्याने अवघ्या पाच लाखात मूत्रपिंड विकल्याचे सांगितले जात आहे. त्याला चंद्रपूर पोलिसांनी गुप्त ठिकाणी ठेवले आहे. तसेच रोशन कुडेसोबत कोलकाता येथे गेलेल्या पथकाला हॉटेलची माहिती, नाव प्रयोगशाळेचे नाव आदि कागदपत्रे मिळाली आहेत. या प्रकरणात आणखी काही डॉक्टर सहभागी असल्याचे बोलले जात आहे.

# काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यावर प्राणघातक हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ६ :**
काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. ही धक्कादायक घटना त्यांचे मूळ गाव अकोट तालुक्यातील मोहाळ येथे मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्राणघातक हल्ल्यामध्ये काँग्रेस नेते हिदायत पटेल गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणुकीच्या या गदारोळातच अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली. अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. त्यांचे मूळ गाव मोहाळ येथे आपसी वादातून हा हल्ला करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.

हिदायत पटेल यांच्यावर लोखंडी पाईपने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामध्ये हिदायत पटेल यांच्या डोक्याला व मानेला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली.

हिदायत पटेल यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालयात हलवून प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना अकोला येथे हलविण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन तपास सुरू केला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्यावर हल्ला करण्यामागे नेमके कारण काय? याचा शोध पोलीस घेत आहेत.

हिदायक पटेल काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत. अकोला लोकसभा मतदारसंघातून २०१४ व २०१९ असे सलग दोन वेळा काँग्रेसचे त्यांना उमेदवारी दिली होती. मात्र, लोकसभेच्या या दोन्ही निवडणुकांमध्ये हिदायत पटेल यांना पराभवाचा सामना करावा लागला. सहकार क्षेत्रावर त्यांची चांगली पकड असून सहकार नेते म्हणून देखील ते ओळखले जातात. अकोला, वाशीम जिल्हा मध्यवर्ती बँकेवर संचालक म्हणून ते कार्यरत आहेत.

# कापडाच्या तुकड्यांपासून मोहक कलाकृती बनवणाऱ्या कलाकार मेधा



लोकमानस

कलाकृती तयार करताना, कलाकार मेधा भट्ट तीन गोष्टी एकत्र करतात - कला, विज्ञान आणि कचरा. मेधा जुन्या कपड्यांपासून आणि कचऱ्याच्या पुनर्वापरापासून बनवलेल्या साहित्याचा वापर करून कॅनव्हासवर वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रतिमा तयार करतात. शून्य कचरा उपक्रमांवर काम करणारी एक उत्साही पर्यावरणवादी, मेधा जे करते ते जादूपेक्षा कमी नाही कचऱ्यापासून कला निर्माण करणे.

अहमदाबादच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनमधून पदवी प्राप्त केलेल्या ४१ वर्षीय महिलेने अलीकडेच तिरुवनंतपुरम येथील लेमन यलो गॅलरीमध्ये 'माय व्हिसलिंग स्कूल बॉय अँड अदर फ्रेंड्स' या शीर्षकाचे तिचे रेखाचित्रे आणि कलाकृतींचे प्रदर्शन भरवले. मेधाच्या कलाकृतींमध्ये पश्चिम घाट आणि हिमालयात तिने पाहिलेल्या पक्ष्यांचे प्रतिनिधित्व आहे. पक्ष्यांमध्ये मलबार व्हिसलिंग थ्रश आहे, ज्याला 'व्हिसलिंग स्कूल बॉय' असेही म्हणतात कारण त्याचे आवाज लहान मुलाच्या शिट्टी वाजवण्यासारखे असतात. सध्या गुजरातमधील वडोदरा येथे राहणारी मेधा पर्यावरणपूरक, शून्य कचरा उपक्रमांमध्ये सहभागी असलेल्या थानल या स्वयंसेवी संस्थेसोबत काम करते.

गुजरातमध्ये, कचऱ्याचा पुनर्वापर करणे ही आमच्या परंपरेत आहे, जसे की रजाई बनवणे. मी पाकिस्तान सीमेजवळील कच्छमध्ये एक संशोधन प्रकल्प देखील केला होता.

मी माझ्या प्रकल्पाचे नाव गार्डन्स ऑफ रण ठेवले. मी तिरुवनंतपुरमला आल्यानंतर, थनल शून्य कचरा उपक्रमांमध्ये सहभागी असल्याचे मला दिसले आणि मी त्यांच्यात सामील झाले. तिथे मला शून्य कचरामागील विज्ञान आणि तत्वज्ञान शिकायला मिळाले. मेधा म्हणते.शून्य कचरा बद्दल मिळालेल्या ज्ञानामुळे मेधाला एक पाऊल पुढे टाकण्यास प्रोत्साहन मिळाले.

कचरा पदार्थ सहसा घाणेरडे, धुळीने माखलेले, चुरगळलेले असतात; कधीकधी त्यांच्या आत झुरळे देखील आढळतात. पण त्यातून निर्माण होणारी कला जादुई आहे. विलापिलसला प्रकरणानंतर, स्थानिकांनी शहरातून कचरा प्रक्रिया केंद्रात आणल्या जाणाऱ्या कचऱ्याला विरोध करण्यास सुरुवात केली. आणि कचऱ्यावर प्रक्रिया करणे ही शहरातील एक मोठी समस्या बनली. मग मी त्याबद्दल अधिक कार्यात्मकपणे विचार करू लागलो, ती म्हणते.

नंतर या कलाकाराने शहरातील मुलांसाठी पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाबद्दल शिकवण्यासाठी एक क्लब स्थापन केला कारण प्रौढांना शिकवणे किती कठीण आहे हे तिला कठीण पद्धतीने शिकायला मिळाले. क्लबमध्ये, ती पर्यावरणीय संतुलनासाठी पक्ष्यांची आवश्यकता कशी आहे आणि मानवांच्या अविवेकी कृतींमुळे हे नाजूक संतुलन कसे बिघडू शकते यासारखी उदाहरणे वापरत असे.

मेधा तीन वर्षांपूर्वी तिच्या मूळ गावी वडोदरा येथे परतली आणि तिथेही अशाच प्रकारच्या उपक्रमांमध्ये सहभागी झाली आहे. त्यासाठी लागणारे श्रम खूप मोठे असतात; कधीकधी स्केचचा एक भाग पूर्ण केल्यानंतर, उर्वरित स्केच करण्यासाठी योग्य साहित्य मिळविण्यासाठी तिला महिने वाट पहावी लागते. एकूणच टाकाऊ कपड्यापासून कलाकृती साकारणाऱ्या मेधा या जादुई कलाकारच आहेत.

■ ■ ■

## : अक्षरधारा :



**खोंबारा**

एका लहान गावातील पत्रकाराच्या जगण्याची धडपड, त्याचा प्रवास, बाह्य जगाशी होणारे त्याचे व्यवहार यांवर आधारित ही कादंबरी आहे. पत्रकाराच्या नजरेतून भोवतालाचा लेखाजोखा प्रत्यकारी पद्धतीने मांडला आहे.
लेखक : प्रमोद मनोहर कोपर्डे
प्रकाशन : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस
पाने : ३१८,किंमत : ५०० रुपये

**फॅमिली बजेट :**

प्रत्येक कुटुंब कळत-नकळत स्वतःपुरते बजेट आखत असते. हे कसे आखावे, काय काळजी घ्यावी हे संवादपूर्ण भाषेत सांगणाऱ्या वृत्तपत्रातील लेखांचे संकलन आहे.
लेखक : विनायक कुळकर्णी पानेः १४१
किंमत : २०० रुपये

**ॲडजस्टमेंट**

मध्यमवर्गी माणसाच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना, चढ-उतार, भावनिक आंदोलने यांना केंद्रिभूत ठेवून असलेल्या कथांचा हा संग्रह आहे. लेखिका : मेघना साने प्रकाशन : डिंपल पब्लिकेशन, पाने:२२७, किंमत : ३५० रुपये

■ ■ ■ ■

## ...असा लागला शोध कपडे टापटीप करणारी इस्त्री



इस्त्रीची सुरवात बघायला गेल्यास तिचे आद्य स्थान सापडते ते चीनमध्ये. तेथील लोक कपड्यांना मुलायम बनवण्यासाठी धातूच्या पसरट भांड्यात पेटते कोळसे ठेवत व कापड पसरून त्यावरुन ते भांडे फिरवत. याच सुमाराला युरोपमधे सुरकुतलेल्या कपड्यांना कडकपणा आणण्यासाठी पसरट व गुळगुळीत दगड, काच किंवा लाकडाचा उपयोग केला जात असे. युरोपमधे झालेल्या उत्खननात असे अनेक हॅण्डल असलेले गुळगुळीत दगड मिळाले आहेत.

१५ व्या शतकात युरोपमधे कपड्यांना इस्त्री करण्यासाठी मँगल बोर्डचा उपयोग केला जात होता. एका लाकडी दंडगोलाकार तुकड्यावर ओलसर कापड गुंडाळले जात असे. मग या कापडाला इस्त्री करायची असे ते कापड एका मोठ्या टेबलावर अंथरुन हॅण्डल असलेल्या एका चपट्या फळीने त्याला टेबलावरील कापडावर फिरवले जात असे. या चपट्या फळीला मँगल असे म्हणले जात असे. १९ व्या शतकात लाटण्याच्या या प्रक्रियेला यांत्रिकी जोड देण्यात आली. वाफेच्या शक्तीवर चालणारे मँगल्स बनवण्यात येऊ लागले. १९३० साली विजेवर चालणारे मँगल्स वापरात आले.

साधारणतः १८ व्या शतकापासून लोखंडापासून इस्त्री बनवण्यात येऊ लागली. लोखंडाप्रमाणे इस्त्री बनवण्यासाठी ईटलीत सोप स्टोन तर फ्रान्समधे टेराकोटा यांचाही वापर केला गेला. ही इस्त्री आगीवर गरम करुन कपड्यांवर फिरवली जाई. या इस्त्रीच्या वरच्या बाजूस लाकडी मुठ असलेले हॅण्डल असे.

ही इस्त्री भरीव लोखंडापासून बनवली जात असे त्यामुळे ती वजनदार असे. आजही अनेक इस्त्रीवाले अशा इस्त्र्या वापरतात.

१९ व्या शतकाच्या अखेरीस वीजेवर इस्त्री गरम करण्याचे अनेक प्रयत्न झाले. १८८० साली न्यूयॉर्क येथील हेन्री सिली या संशोधकाने वीजेवर तापवता येणा ?या इस्त्रीची निर्मिती केली व १८८२ साली त्याला त्याचे पेटंट मिळाले. हेन्रीने १८८३ साली आपला सहकारी डायर याच्या बरोबर आणखी एका वेगळ्या इस्त्रीचे पेटंट मिळवले. विजेवर चालणारी इस्त्री कायम विजेशी जोडलेली असल्याने सतत गरम रहात असे.

■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# समृद्धीवर धावत्या बसचा आगीत झाला कोळसा



५२ प्रवाशांचे प्राण वाचले

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ६ :**
नागपूरवरून मुंबईकडे जाणारी एक खाजगी ट्रॅव्हल्स अचानक मंगळवारी पहाटे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील ५२ प्रवाशांचे प्राण वाचले.

आज पहाटेच्या सुमारास ही ट्रॅव्हल्स नागपूरवरून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने जात होती. मेहकर तालुक्यातील शिवनी पिसा गावाजवळ बस आली असता, इंजिनमधून धूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्याने क्षणाचाही विलंब न करता बस रस्त्याच्या कडेला उभी केली आणि आरडाओरड करून सर्व प्रवाशांना तातडीने खाली उतरवले.

चालकाच्या या सतर्कतेमुळे गाढ झोपेत असलेले प्रवासी तातडीने खाली उतरले. सर्व प्रवाशी खाली उतल्यानंतर काही मिनिटांतच बसने पेट घेतला आणि डोळ्यांदेखत संपूर्ण बस जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहाणी झाली नाही. मात्र, धावपळीत आणि घाबरलेल्या अवस्थेत काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या असून, त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, मात्र तोपर्यंत बसचा सांगाडाच शिल्लक राहिला होता. आग नेमकी कशामुळे लागली? याचे कारण अद्याप अस्पष्ट असले तरी ही आग शॉर्टसर्किट किंवा तांत्रिक बिघाडामुळे लागली असावी असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

आजच्या अपघाताने बुलढाणाकरांच्या मनात १ जुलै २०२३ च्या भीषण आठवणी ताज्या केल्या. १ जुलै २०२३ रोजी समृद्धी महामार्गावरील सिंदखेडराजा लगत मध्यरात्री १.३० च्या सुमारास विदर्भ ट्रॅव्हल्स या खासगी बसचा अपघात झाला होता. डिझेलच्या टाकी फुटल्यामुळे या बसला आग लागली.

या अपघातात झोपेत असलेल्या २५ प्रवाशांचा जागीच कोळसा झाला. कोणता मृतदेह कुणाचा हे सुद्धा ओळखता येत नव्हते. शेवटी बुलढाण्यात २ जुलैला २६ मृतदेहांवर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले होते.

## आमची विचारधारा तुम्हाला
# स्वीकारावीच लागेल..

### अमोल मिटकरींनी भाजप नेत्यांना ठणकावले



■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. ६ :**
तुमची विचारधारा आम्ही स्वीकारत, नसलो तरी आमची विचारधारा तुम्हाला स्वीकारावीच लागेल,ह्व अशा शब्दात राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी भाजप नेते आशिष शेलार यांना ठणकावले आहे. अमोल मिटकरी आणि आशिष शेलार यांच्यात जुंपली असून ऐननिवडणुकीत महायुतीत तणाव यांनी आम्ही स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांचे भक्त आहोत. आम्ही आणि आमचा पक्ष सावरकरांच्या विचारांवर चालणारे आहोत. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला सुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. या वक्तव्यामुळे महापालिका निवडणुकीच्या अगोदरच भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जुंपली आहे. आशिष शेलार यांच्या वक्तव्याला राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी प्रत्युत्तर दिले.

आमदार अमोल मिटकरी म्हणाले, अजित पवार व त्यांचा पक्ष तुमच्या आदर्शांच्या नेतृत्वावरच चालला पाहिजे, हा जो तुमचा अट्टाहास आहे व हे जे तुम्ही ठासून सांगत आहात त्यात किती तथ्य आहे, हे तुम्हालाच माहीत. तुर्तास इतकंच सांगेल आम्ही शिव, शाहु, फुले, आंबेडकरी चळवळीशी बांधिल व प्रामाणिक होतो, आहोत आणि राहू. तुम्हाला अपेक्षित विचारधारा आम्ही जरी स्वीकारत नसलो तरी आमच्या पक्षाची आंबेडकरी विचारधारा तुम्हाला नाईलाजाने का होईना स्वीकारावीच लागते, हे त्रिवार सत्य आहे. आमदार अमोल मिटकरी यांनी दिलेल्या प्रत्युत्तरावर आता भाजप काय भूमिका घेणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार व भाजप प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्यातील आरोप-प्रत्यारोपातही राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी उडी घेऊन टीका केली होती. व्यवस्थित बोला, काळजी पूर्वक बोला, अन्यथा राष्ट्रवादीचा कार्यकर्ता कदापी सहन करणार नाही, अशा शब्दात आ. मिटकरी यांनी आ. रवींद्र चव्हाणांना प्रत्युत्तर दिले होते. आता पुन्हा त्यांनी आशिष शेलार यांचेवर पलटवार केला आहे.

